# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. २०/०७/२०११**

आज बुधवार दि. २०/०७/२०११ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०४ दि. ११/०७/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | पाटील जयंत महादेव | उपमहापौर |
| ३) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील प्रभात प्रकाश | सभागृह नेता |
| ५) | शेख आसिफ गुलाब | विरोधी पक्षनेता |
| ६) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ७) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ८) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ९) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| १०) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १३) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १४) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १५) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १६) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १७) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १८) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १९) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| २०) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| २१) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २२) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २३) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २५) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २६) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २७) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २८) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २९) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३०) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३१) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३२) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३३) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३४) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३५) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३६) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३७) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३८) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३९) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ४०) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ४१) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४२) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ४३) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४४) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४५) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४६) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४७) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४८) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४९) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ५०) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ५१) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५२) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५३) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५४) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ५५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५६) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५७) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५८) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५९) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ६०) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६१) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६२) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६३) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६४) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६५) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६६) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६७) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६८) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६९) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ७०) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ७१) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ७२) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७३) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७४) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ७५) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| २) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ३) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| २) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ३) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ४) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा बुधवार, दि. २०/०७/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०४, दि. ११/०७/२०११ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी

आयोजित करण्यांत येत आहे. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. ११ वाजून ५० मिनिटे झालेली आहेत. प्रश्न क्र.४३ श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांचा प्रश्न आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, प्रश्नोत्तरे सुरु करण्यापूर्वी या महापालिकेला आपले नविन मा. आयुक्त लाभलेले आहेत. आज पहिल्यांदा ते या सभागृहामध्ये आलेले आहेत. भारतीय जनता पक्ष आणि माझ्या मते सर्व सभागृहाच्या वतीने मी त्यांचे अभिनंदन करतो आणि या सभागृहाने वेळोवेळी प्रशासनाला साथ दिलेली आहे. प्रशासनाने महापालिकेच्या दृष्टीने नगरसेवकांच्या सांगण्यावरुन जे काही करता येईल ते कार्य केलेले आहे. आपल्याकडुन आम्ही तीच अपेक्षा करतो. वाढता गाव आहे. पूर्वी गांव होता, आत्ता शहरामध्ये रुपांतर झालेले आहे. बारा ते पंधरा लाखाची लोकवस्ती झालेली आहे. अनेक समस्या आहेत हेही नक्की आहे की, आपण वेळेप्रमाणे वेळ देऊ शकत नसाल किंवा वेळ कमी असल्यास इकडची पध्दत आहे की, आमच्या नगरसेवकांना काही अडचण आली की, ते ताबडतोब भेटायला जातात. अशावेळी आपल्याकडुन आम्हाला पूर्ण सहकार्य मिळेल अशी सभागृहातर्फे माझ्या वतीने अपेक्षा व्यक्त करतो. भारतीय जनता पार्टीतर्फे मी आपले पून्हा अभिनंदन करतो आणि आपण जे जे काम आम्हाला या सभागृहाच्या वतीने सांगाल त्याला आम्ही पूर्ण सहकार्य देऊ अशी ग्वाही मी आपल्याला देतो.

**वंदना चक्रे :-**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आणि महिला आघाडीच्या वतीने नवनीत कमिश्नर साहेब यांचे मी या सभागृहामध्ये स्वागत आणि अभिनंदन करते आणि सांगितल्याप्रमाणे आम्हाला सहकार्य करावे अशी आशा बाळगते. आम्हाला असे वाटते की, आमची पहीली टर्म आहे परंतु, असे कमिश्नर आम्हाला पहिल्यांदा लाभलेले आहेत. तर साहेब, आमची आपल्याकडुन अशीच अपेक्षा आहे की, आम्हाला चांगल्या पध्दतीने सहकार्य करावे. आम्हीसुध्दा तुम्हाला चांगल्या पध्दतीने सहकार्य करु.

**प्रशांत पालांडे :-**

शिवसेना पक्षाचा गटनेता म्हणून मा. आयुक्त साहेब, आपले या सभागृहामध्ये मी स्वागत करतो. या शहराला पहिल्यांदाच आयएएस ऑफिसर मा. आयुक्त म्हणून लाभलेला आहे. त्यामुळे केवळ सदस्यांची नव्हे तर या शहरातील सर्व जनतेची फार मोठी अपेक्षा आपल्याकडुन आहे आणि ती अपेक्षा आपण पूर्ण कराल अशी मला खात्री आहे. आणि त्याकरीता आम्ही शिवसेनेच्या वतीने आपल्याला शुभेच्छा देतो. धन्यवाद.

**एस. ए. खान :-**

मा. नवनियुक्त आयुक्त श्री. विक्रमकुमार यांचे आमच्या संयुक्त लोकशाही आघाडी तर्फे या सभागृहामध्ये हार्दीक अभिनंदन करतो आणि अपेक्षा बाळगतो की, ते या सभेचे कामकाज व्यवस्थितरीत्या पार पाडतील अशी शुभेच्छा देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आज माझा जो प्रश्न आहे, या शहराच्या आरोग्याच्या दृष्टीने फार महत्वाचा विषय आहे. एकतर महापालिकेला मोठे रुग्णालय नसल्याने पूर्ण मिरा भाईंदरच्या लोकांना खाजगी रुग्णालय, खाजगी पॅथोलॉजिकल लॅबोरेटरी किंवा एक्स-रे याच्यावर डिपेंडंट रहावे लागते आहे. आपले मिरारोडचे आरोग्य दवाखाने अजून सुरु झालेले नाहीत आपण काही गोष्टी तात्पुरत्या केलेल्या आहेत. अशा वेळी मी हा प्रश्न टाकला होता की, या शहराच्या लोकांना चांगले आरोग्य मिळावे आणि येणारे डॉक्टर आणि येणारे पॅथोलॉजिकल लॅब जे काही असतील त्यांनी नागरीकांची योग्य ती काळजी घ्यावी पण आज मला प्रशासनाकडुन जे उत्तर मिळाले फार मोठी गंभीर बाब आहे, यामध्ये भाईंदरला जे डॉक्टर, पॅथोलॉजी लेबॅरेटरी किंवा एक्स रे यांची जी यादी दिलेली आहे त्यामध्ये असे दिसून येते की, वैद्यकीय आरोग्य विभागामध्ये नोंद न केलेल्या अशा शंभर डॉक्टरांची नोंद मला मिळालेली आहे ज्यांनी महापालिकेच्या आरोग्य खात्याकडे आपली नोंद केली पाहिजे. का केली नाही ही प्रशासनाची बाजू प्रशासन मांडणार आहे. दुसरी गोष्ट, पॅथोलॉजिकल माहिती, एखादा छोटासा उपचार काही करायचा असेल तर डॉक्टर पहिला रक्त तपासणी, लघवी तपासणी करायला पाठवतो आणि रक्त आणि लघवी तपासणी करताना ज्याच्यामध्ये काही अंश असेल त्याच्यावर डॉक्टर उपचार करतो. या मिरा भाईंदरमध्ये २१ पॅथोलॉजीकल लेबोरेटरी हे रजिस्ट्रेशन झालेले नाहीत. तीन-चार महिन्यापूर्वी काही पॅथोलॉजीकल लेबोरेटरीवर धाड टाकल्या गेल्या त्यांचे नमुने घेतले गेले. त्यांच्या लेबोरेटरीमध्ये येणारे रीपोर्ट बरोबर येत नाहीत असे वर्तमानपत्रामध्ये छापून आले होते. आज या प्रश्नाचा उपप्रश्न म्हणून माझे दोन-तीन विषय आहेत. त्याच्यावर प्रशासनाने उत्तर द्यावे. एकतर जे १०० पेक्षा जास्त आहेत, पण आपण शंभरची यादी दिलेली आहे. २१ पॅथोलॉजीकल लेबोरेटरी आहेत तेही जास्त प्रमाणात आहेत. यांची नोंदणी का झाली नाही? प्रशासनाने त्याच्यावर का दखल घेतली? काय कारण आहे? माझा दुसरा प्रश्न आहे की, जे नर्सिंग होमला आपण तपासणी करायला जातो, आपले काही डॉक्टर्स नेमले असतील. ते कशापध्दतीने नेमलेले आहेत? म्हणजे कोण डॉक्टर कुठल्या प्रभागामध्ये कसा बघतो याची माहिती या प्रश्नोत्तराच्या संदर्भात मिळावी आपण या महापालिकेमध्ये अनेक उपविधी केल्या एक साधा कुत्र्याची म्हणजे खाजगी कुत्रा किंवा रस्त्यावर फिरणा-या कुत्र्यावरही आपण उपविधी केली. ही आरोग्य अत्यावश्यक सेवा आहे. याच्यावर प्रथमतः उपविधी झाली पाहिजे होती पण प्रशासनाने त्या उपविधीवर का लक्ष दिले नाही,

का केले नाही याचेही उत्तर मला मिळाले पाहिजे आणि धर्मादाय ट्रस्टची पाच हॉस्पीटल दाखवलेली आहेत आणि शासनाचे या धर्मादाय ट्रस्टबद्दल काही जी आर आहेत याची माहिती बहुतेक महापालिकच्या कोणत्याही नगरसेवकांना नाही की, या धर्मादाय ट्रस्टचे जे हॉस्पीटल आहे त्यांना महापालिका आपल्या माध्यमातून नागरीकांना काय फॅसिलिटी देऊ शकते? किंवा नगरसेवकांना काय अधिकार दिलेले आहेत की, या धर्मादाय ट्रस्टमध्ये जे दारीद्र्य रेषेच्या खाली आहेत किंवा असा रुग्ण ज्याला उपचारासाठी पैसे मिळणे कठिण आहे अशा उपचारांना महापालिकेचे आयुक्त किंवा संबंधीत अधिकारी यांनी पत्र दिल्यावर त्याचे उपचार होतील याची माहिती आपल्या विभागातर्फे कुठेही दर्शनीय भागामध्ये लावलेली नाही याबाबत मी जे पाच प्रश्न केलेले आहेत त्याबाबत आपण सविस्तर उत्तर दिले तर बरे होईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो साहेब, आपल्याकडे एकूण ११३ हॉस्पीटल आहेत. ११३ संपूर्ण आपण रजिस्टर केलेले आहेत. पाच चेरेटेबल हॉस्पीटल आहेत त्यांनासुध्दा आपण रजिस्टर केलेले आहे. एकूण ४१८ क्लीनीक आहेत बॉम्बे नर्सिंग होम ॲक्टनूसार फक्त हॉस्पीटलला रजिस्टर करणे हे कायद्याने बंधनकारक आहे तथापि, ४१८ क्लीनिकपैकी २९५ क्लीनिकला सुध्दा आपण रजिस्ट्रेशन केलेले आहे. बॉम्बे नर्सिंग ॲक्ट नूसार आपण फक्त हॉस्पीटललाच रजिस्टर करतो इतर महानगरपालिकेमध्ये आम्ही चौकशी केली असता क्लीनीकना कुठेही रजिस्टर करत नाहीत ज्या ठिकाणी बेड असतात, ज्या ठिकाणी नर्सिंग स्टाफ असतो, क्वालीफाय स्टाफ असतो अशांचे आपण रजिस्ट्रेशन करतो तरीपण आपण ४१८ पैकी २९५ रजिस्टर केले. बाकी १२३ ला तुम्ही रजिस्ट्रेशन करावे म्हणून तसे शासनाचे गाईडन्सपण आपण मागवणार आहोत की, यांना रजिस्ट्रेशन करणे कम्प्लसरी आहे की नाही? आजच्या घडीला असे कम्प्लशन नाही तरी मार्गदर्शन करुन मा. महासभा म्हणत असेल तर मा. महासभेचे धोरण घेऊन शासनाला या संदर्भात क्लीनीकला रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे की नाही याबाबत मार्गदर्शन मागवून घेऊन त्यांचे रजिस्ट्रेशन करुन घेऊ दुसरे डेंटल क्लीनीक एकुण ३८ आहेत................

**नरेंद्र मेहता :-**

श्री. पानपट्टे साहेब, एक मिनिट खुलासा करतो. मागच्या वेळी आपणच विषय आणलेला जे लायसन्स फी होते त्याच्यामध्ये क्लीनीकसुध्दा आपण डिस्पेन्सरी म्हटलेले आहे आणि आत्ता सांगता की, करायचे की नाही हा निर्णय अजून झाला नाही चुकीची माहिती देऊ नका.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब चुकीची माहिती देत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

सभागृहाने डिस्पेन्सरीचे किती पैसे आकारायचे हे झालेले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, रेट्स मंजूर झाले ते वेगळे आहे रेट्स मंजूर करणे वेगळे आणि ॲक्टनूसार वसूल करणे वेगळे आहे बॉम्बे ॲक्टनूसार फक्त हॉस्पीटल करणे महत्वाचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण सेक्शन ८ प्रमाणे मला काल एक उत्तर दिलेले आहे, Qualified medical practitioner means a medical practitioner register under the Bombay Medical Act, 1912, Bombay sixth of 1912 of any other law for time being in the force म्हणजे रजिस्ट्रेशन नाही करायचे कोणी मेडीकल प्रॅक्टीशनर असो त्याला बॉम्बे ॲक्टच्या अंतर्गत तुमचे मिळालेले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

खाजगी रजिस्ट्रेशन वेगळे त्या ॲक्टनूसार प्रत्येक डॉक्टरचे स्वतःचे रजिस्ट्रेशन असते ते वेगळे आणि आपल्या याच्यामध्ये रजिस्ट्रेशन करणे वेगळे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण सहा महिन्यापूर्वी............

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण क्लीनीकवाल्यांना फक्त परवाना देऊ शकतो तो फक्त चार पाच तासाचा बिझनेस असतो. चार तास फक्त ओ.पी.डी. करतो आणि जातो. दिवसभर हॉस्पीटल ओपन नसते आणि तिथे कोणी ॲडमिट होत नसते म्हणून आपण त्याला रजिस्ट्रेशन............

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुमच्या माहितीसाठी सांगतो आपण अंदाजे सहा महिन्यांपूर्वी डॉक्टरवर कारवाई केली आपण १५ ते १६ डॉक्टर सील केले त्यातले काही डॉक्टर परत सुरु झाले. सर्टीफिकेट आणली कशी आणली तो माझा विषय नाही ते सुरु झालेले आहेत आजही जे जनरल प्रॅक्टीशनर डॉक्टर्स आहेत. त्यांना किती अनुभव आहे एम.बी.बी.एस. आहेत, आर्युवेदीक आहेत की, एलोपॅथिक आहेत, हे मला माहिती नाही अशा डिस्पेन्सरीमध्ये डॉक्टर स्वतः सलाईन लावतात कारण खेडेगावामध्ये डॉक्टर मिळाला नाही की, डॉक्टरकडे जातात आणि सलाईन लावतात जर तुम्ही यामध्ये १०० लोकांची यादी बघितली तर याच्यातील अर्धे डॉक्टर

खेडेगावातील आहेत म्हणजे आज आपण असे सांगितले की, ग्रामीण भागात डॉक्टर मिळत नाही म्हणून आपण त्यांना हमी दिलेली आहे असे आपले मत आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

अजीबात नाही ज्याचे रजिस्ट्रेशन झालेले नाही त्यांच्याकडे डॉक्युमेंट नाहीत आणि दुसरी गोष्ट ब-याच डॉक्टरचे रजिस्ट्रेशन नव्हते त्यामुळे आपण त्यांना रजिस्ट्रेशन केले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, हा डॉक्टरांचा विषय आहे. आरोग्य अधिका-यांनी साफसफाई केली नाही म्हणून सभागृहाने त्यांना निलंबित केले आणि हा तर डॉक्टर आहे. एका डॉक्टरने साधी गोळी दिली त्याचे रिॲक्शन झाले तरी तो माणूस मरु शकतो आणि शंभर डॉक्टर आहेत. एक दोन डॉक्टर असते तर मी मान्य केले असते आणि एकवीस पॅथोलोजिकल लेबोरेटरी आहेत. तुम्ही याला गांभीर्याने घ्या. म्हणजे एकतर प्रशासनाने चुक मानावी की, याच्यावर आमचे लक्ष नव्हते आम्ही आत्ता लक्ष घालू.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, चुक नाही. त्यांना नोटीसपण दिलेल्या आहेत. पण ॲक्टनुसार तेवढे फोर्सफुली करु शकत नाही, आपण हॉस्पीटल जसे फोर्सफुली करु शकतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही पॅथोलोजिकल लेबोरेटरीला सील केले होते? तुम्ही त्यांच्यावर सर्व कायदेशीर कारवाई............

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

होय.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग त्यावेळी या २१ पैकी किती होती?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

पॅथोलोजिकल लॅब एकूण ६१ आहेत, त्यापैकी ४० रजिस्टर्ड केलेल्या आहेत आणि २१ ला अंतिम नोटीस दिली आहे. २१ ला आम्ही अंतिम मुदत दिलेली आहे की, एका महिन्याच्या आत केले नाही तर आम्ही सील करणार अहोत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही मला हे पत्र पाठवता आणि त्याच्यामध्ये काही देत नाही. तुम्ही कधी रजिस्ट्रेशन केले आहे, कोणत्या मुदतीसाठी केले आहे, यांना कधी नोटीस दिल्या आहेत, याच्यात काही नाही. म्हणजे प्रशासन फक्त या सभागृहापुरते बोलते. नंतर त्याला फॉलोअप करत नाही. हे सर्वांनी बघितलेले आहे. मागच्या दहा वर्षापासून मी बघतो आहे. आत्ता तुम्ही सांगितले की, नोटीस दिलेली आहे. तुम्ही सांगा नोटीस कधी दिली? आज पॅथॉलॉजिकल लेबोरेटी, एका माणसाला डायबीटीज आहे की, नाही, त्यांनी डायबिटीसचा रिपोर्ट दिला. तुम्ही याला साधा विषय का समजता?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

दुसरा मुद्दा एनजीओ ची माहीती होती ती सर्व सन्मा. सदस्यांना देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही विषयांतर करता. मा. आयुक्त साहेब, हा विषय आरोग्याशी निगडीत आहे.आपण स्वतः मागच्या वेळी डॉक्टरकडे सर्टिफिकेट नाही, त्यांच्यावर कारवाई केली. पंधरा ते वीस डॉक्टर होते. त्या गोष्टीला फक्त सहा महिनेपण झाले नसावेत. आणि शंभर लोकांची यादी माझ्याकडे देता. म्हणजे ते जे काम त्यावेळी केले ते हेतु पुरस्सर केले का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

या शंभर लोकांचे पुन्हा तपासून घेऊ. पुन्हा जर बोगस कागदपत्रे त्यांच्याकडे आढळली तर पुन्हा बंद करू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी तुम्हाला बंद करायला प्रश्नोत्तरे केलेली नाहीत. प्रशासनाला आम्ही सांगायचे आणि नंतर प्रशासनाने लक्ष द्यायचे असे आपले मत आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, ॲक्टनुसार आपण त्याला कम्पलशन करू शकत नाही. फक्त त्यांना परवाना घेण्यासाठी कम्पलशन करू शकतो. ब-याच लोकांनी परवाना घेतलेला आहे. ॲक्टनुसार फक्त हॉस्पीटलला बंधनकारक आहे. हे स्पष्ट सांगितले. तरी सुध्दा आपण ३०० लोकांकडून रजिस्ट्रेशन करून घेतले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठाण्यामध्येपण, झोला डॉक्टर असा विषय येतो. झोला डॉक्टरवर कार्यवाही व्हावी. त्याच्यामध्ये दोन डॉक्टर डेंन्टीस्ट आहेत. त्यांच्याकडे किती सुविधा आहेत ते मला माहीती नाही. नाहीतर पक्कड मध्ये धरून दात काढतात असे डॉक्टर आहेत का? साहेब, तुम्ही मान्य करा की, ही प्रशासनाची एक चुक झालेली आहे. तुमच्याकडे डिपार्टमेंट नाही असे सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तुमचा प्रश्न होता की, यांचे रजिस्ट्रेशन का झाले नाही? त्याचे उत्तर याच्यामध्ये स्पष्ट दिले आहे. त्याच्यामध्ये कोणी बोगस डॉक्टर असतील तर तपासून घेऊ. विषय संपला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून मी उपप्रश्न विचारला. तुमच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले की, एवढे खाजगी आहे, एवढे आहे, सर्व ठिक आहे. तुमचे उत्तर मिळाल्यानंतर ज्या शहराला आरोग्य मिळाले पाहिजे. आज अशा डॉक्टरांची यादी तुम्ही मला दिली. पॅथॉलॉजीची यादी दिलेली आहे. १२० डॉक्टर ज्यांच्याकडे रजिस्ट्रेशन नाही, त्यांच्याकडे डिग्री आहे की नाही हे पण माहीती नाही. आणि रजिस्ट्रेशन न करण्याचे कारण काय? तुम्ही कधी तपास केली की, रजिस्ट्रेशन का करत नाही? पाचशे रूपये तुमची फी आहे. त्या डॉक्टरकडे पाचशे रूपये नाहीत का? मग तुम्ही एकतर सांगा की, त्यांच्याकडे डिग्री नाही. किंवा त्यांच्याकडे बाहेरची डिग्री आहे, इकडे करता येत नाही म्हणून तो क्वॉलीफाईड आहे. म्हणून आम्ही त्याला चालवायला दिले आहे. तुमचे काय म्हणणे आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, आम्ही त्यांना नोटीस दिली आहे. कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर..............

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नोटीसची तारिख सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

दोन-तीन वेळेस नोटीस दिल्या आहे. प्रत्येक प्रायमरी हेल्थ सेंटरच्या ज्युरिडिक्शनमध्ये जे मेडिकल ऑफीस आहेत, त्यांना वारंवार जाऊन नोटीस दिलेल्या आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मला नोटीसची एक तरी तारिख द्या.

**जुबेर ईनामदार :-**

रजिस्ट्रेशन बंधनकारक आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ॲक्टनुसार फक्त हॉस्पीटल आहेत. त्याचे स्वतःचे रजिस्ट्रेशन असले पाहिजे. क्लिनीकल बंधनकारक नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कॉलीफाइड मेडीकल प्रॅक्टीशनर, त्याच्यामधले जी.पी., एम.डी. असा काही उल्लेख नाही. काल तुम्हीच दिलेले आहे.

**डॉ. प्रदीप पडवळ :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. बोगस डॉक्टर संदर्भात आपण मागे कार्यवाही केली होती. आपण जे हॉस्पीटल सील केले होते, ते बोगस, डॉक्टर होते म्हणून सील केले होते. अनरजिस्टर्ड किंवा ज्यांनी रजिस्ट्रेशन केलेले नाही. म्हणून आपण कुठलेही सील केलेले नाही. कारण अनरजिस्टर्ड आहे म्हणून सील करायचा आपल्याला अधिकार नाही. बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत जे हॉस्पीटल, नर्सिंग होम, जनरल हॉस्पीटल जे आहेत, त्यांना आपण रजिस्ट्रेशन देतो. तरी पण २००४ साली मा. महासभेचा जो ठराव झालेला आहे की, बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत हॉस्पीटलबरोबर महापालिकेने क्लीनीकचेही रजिस्ट्रेशन करावे. अशा प्रकारचा मा. महासभेचा एक ठराव आहे. त्याचा आधार घेऊन आपण क्लीनीकला रजिस्ट्रेशन करतो आणि आपले जवळपास २९५ क्लीनीक असे रजिस्टर्ड आहेत आणि जे १२३ अनरजिस्टर्ड आहेत, त्याचे सर्वांचे डिग्री सर्टीफिकेट वगैरे डॉक्युमेंट्स आपल्याकडे आहेत. त्याच्यापैकी कोणीही बोगस डॉक्टर नाही. बी.एम.एस., बी.एच.एम.एस., एम.बी.बी.एस. जे आहेत किंवा त्यांचे रजिस्ट्रेशन नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, मी दोन मिनिटांत विषय संपवतो. सभागृहात वेळ चालला आहे. विषय फक्त एवढा आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये ज्या शहरात कोणीही व्यवसाय करतो, त्या महापालिकेचे नाहरकत त्याच्याकडे असावे हे एक झाले. नंबर दोन, मागच्या वेळी मा. महासभेने कोणत्या व्यवसायाकडून किती रक्कम आकारायची याचा एक ठराव झालेला आहे. कुठल्याही व्यवसायाची उपविधी अजून झाली नाही. पण त्या ठरावा अनुसार मग फॅक्टरी असू द्या, इतर असू द्या, शाळा असू द्या, आपण त्यांच्याकडुन लायसन्स फी आकारतो आत्ता श्री. पानपट्टे साहेब बोलतात की, ते बंधनकारक नाही. मग २९५ ला तुम्ही रजिस्ट्रेशन कसे केले? एकाला तुम्ही रजिस्ट्रेशन करता, दुसऱ्याला बोलता की, बंधनकारक नाही म्हणून केले नाही तरी चालेल दोन्ही गोष्ट होऊ शकत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

२९५ वसुल केले मी ॲक्टनुसार सांगतो.

**नरेंद्र मेहता :-**

माझे म्हणणे एकच आहे की, दोन गोष्टी लागू होऊ शकत नाही त्यांनी मागितले म्हणून तुम्ही द्यायचे का? ॲक्टमध्ये नाही तर तुम्ही द्यायचेच नाही आणि ॲक्टमध्ये आहे, तर दोघांना द्या तुम्ही असे बोलू शकत नाही की, जो मागायला आला, त्याला दिले, ज्याने मागितले नाही, त्यांनी घेतले नाही तरी चालते असे होऊ शकत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

होऊ शकत नाही म्हणून आपण त्यांना नोटीस दिली.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, या चर्चेमध्ये आपल्याला समजले असेल. याचा एकच मुद्दा आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एकतर आर्थिक नुकसान होते आहे. ज्यावेळी गुन्हा दाखल केले जातात जे डॉक्टर बोगस आहेत ते माहिती कसे पडणार की, हा डॉक्टर बोगस आहे की नाही? ज्यावेळी एखाद्याने तक्रार केली मग पूर्ण शहराच्या डॉक्टरकडे जायचे, त्याचे तपासायचे की, सर्टीफिकेट आहे की नाही नंतर त्याच्यातील चार शोधायचे कमीत कमी आपण परवानगी दिली तर आपल्याला माहिती पडेल की, हा डॉक्टर जो आहे, He is Qualified, He is well educated आणि जे नसतील त्यांच्यावर गुन्हा दाखल करता येईल तुम्ही काहीतरी मिसगाईड करता. पहिले सांगतात की, आपण पैशांचे धोरण ठरवले, पण शासनाने मंजूरी दिली नाही. तुम्ही ही चुकीची माहिती दीली. दुसरे तुम्ही २९५ रजिस्ट्रेशन केले आत्ता तुम्ही सांगितले की, हे बंधनकारक नाही मग एकच काय ते दोघांना लागू होऊ शकत नाही. आत्ता मी सांगितले की, माझी डिस्पेन्सरी आहे तुम्ही मला बोलणार की, घेतले तरी चालेल, नाही घेतले तरी चालेल? आणि ओमप्रकाशजी कडून त्याच लायसन्सला पैसे घेतात ते कसे होऊ शकते? Either it is compulsory, Either it is not required. दोन्ही कायदे एकावेळी एका शहराला लागू शकत नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, या विषयाच्या अनुषंगाने बोलतो या अगोदर आपल्या शहरामध्ये हॅपिटायटिस-बी चे एक लावले होते. याची तक्रार मा. आयुक्तांना स्वतः भेटून गेली होती. मा. आयुक्तांनी चौकशी मागवली त्याचा अहवाल आपल्या मेडीकल ऑफिसरने १९/०७ ला दिला. माझी तक्रार काय होती आणि अहवालामध्ये ज्या माणसाने स्वतःकडे लायसन्स नसताना सुध्दा किंवा महानगरपालिकेची परवानगी न घेता किंवा आपल्या हाताखाली जो प्रत्यक्ष लसीकरण करणारा माणूस आहे, त्याच्याकडे डीग्री नसतानासुध्दा पल्स पोलिओचे लसीकरणाचे काम आणि प्रत्येक घरात जाऊन चारशे-चारशे रुपये वसुल केले आहे. कार्ड वाटले आहेत. घराघरात जाऊन लोकांना इन्वाईट केले आहे. या डिस्पेन्सरीमध्ये बोलवले आहे. हेपिटायटीस-बी आणि अन्य लस द्यायच्या आणि लोकांना बोलून पहीले पंधरा रुपये कार्डचे आणि त्यानंतर इतर आकारणी, त्यानंतर आपल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मा. आयुक्तांना मिसगाईड करायचा जो रिपोर्ट सादर केला तो हा आहे. याच्यामध्ये त्यांनीच सादर केलेल्या कागदात, म्हणजे आपल्या हाताखालचे अधिकारी, मुख्य वैद्यकीय अधिकारी, आम्हाला बोलायला खराब वाटते की, साहेब मी एम.बी.बी.एस. नाही. परंतु हे कागद बोलतात. या कागदामध्ये स्पष्टपणे उल्लेखित केले आहे की, How to select PP, NGO, NH clinic? How will selected? म्हणजे ज्यांनी काय काम करायचे ते, त्याच्यामध्ये त्यांनी ४२(A) क्रमांकाचे दिले आहे, त्याच्यामध्ये सरळ दिले आहे, Individual service provider should be qualified MBBS, MD असे असताना जो माणूस प्रत्यक्ष पोलिओचे डोस वगैरे पाजतो. त्याला कुठलीच परवानगी नाही आणि त्याचे सर्टीफिकेटपण नाही आत्ता तुमच्या मेडीकल नॉर्मनुसार काही परवानग्या द्यायच्या त्या द्या, नका देऊ. आमच्या इकडे झोपडपट्टीमध्ये सील केलेली हॉस्पीटल, डिस्पेन्सरी मा. आयुक्त साहेब, जरा तुम्ही स्वतः फिरा आणि या शहरामध्ये आढावा घ्या, ह्या लोकांनी सील केल्या ज्या डिस्पेन्सरी आहेत, त्या संध्याकाळी तुमची पीएससी बंद झाल्यानंतर परत चालू होतात. आपल्या इकडे ते लोक तीन हजार रुपये हफ्ते देतात आणि असे अनेक दवाखाने संध्याकाळी चालू असतात आणि त्याच्यामध्ये प्राथमिक उपचाराकरीता ज्या गोळ्या असतात त्या विकल्या जातात आणि सगळ्यांकडे युनानीची परमिशन आहे म्हणजे एकीकडे बारवर धाडी टाकायच्या आणि दारुचे अड्डे सर्रास चालू आहेत. माझ्या वॉर्डमध्ये मी स्लममधुन नगरसेवक आहे. तिकडच्या डिस्पेन्सरी या लोकांनी बंद केल्या. एकतर तुम्ही त्यांना परमिशन द्या आणि चालू ठेवायला लावा, अन्यथा ते कायमचे बंद करा चार वाजता आपली ओपीडी संपली, आपले एमओ गेले की, ते सगळे दवाखाने चालू असतात. हे सगळे दृष्टीपथास आणले. आपल्याकडे खोटा खुलासा सादर केला. हे त्यांनी दिलेलेच पेपर माझ्याकडे आहेत. याच्यामध्ये त्यांचे क्वालिफिकेशन दिलेले आहे. त्याबद्दल या खुलाशात काही म्हटलेले नाही. ही जी संस्था आहे, याचे रजिस्ट्रेशनचे एकही सर्टीफिकेट या खुलाशामध्ये दिलेले नाही याच्यावर आपण काय कारवाई कराल? अन्यथा आपण असेच चालू ठेवू. शहरामध्ये जशा पान टपऱ्या लागतात तशा ओपीडी सगळीकडे चालू होतील. आत्ता हॉस्पीटलच्या जाहीराती आम्ही होर्डींग बघायला लागलो. आत्ता हॉस्पीटलच्या होर्डींग लागल्या आणि एफ.एम. ला ॲडव्हटाईज येतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, २८५ वर आम्ही रजिस्ट्रेशन केले. बाकीचे केले नाही म्हणजे महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. याबद्दल आपण जी योग्य वाटेल ती कार्यवाही त्वरीत करावी २१ पॅथोलॉजिकल लेबोरेटरी आहेत. जी खरोखर रजिस्टर्ड नाहीत, चांगली आहे, त्यांच्याकडे डिग्री आहे, पण काही कारणामुळे त्यांनी घेतले नाही त्याच्यावरही तुम्ही ताबडतोब, कारण एका पॅथोलॉजिकल लेबोरेटरीच्या एका रिपोर्टमुळे माणसाचा जीव जाऊ शकतो याची आपण दखल घ्यावी. आपण उत्तर देताना विचारपण केला नाही. सरळसरळ दिले की, २१ पॅथॉलॉजिकल लेबोरेटरीला मान्यता प्राप्त नाही. असे सांगून चालणार नाही. आत्ता माझे जे दोन प्रश्न, माझे दुसरे उपविधी आपण महापालिकेत या विषयाची उपविधी का आणली नाही? आणि आणणर असतील तर किती दिवसात आणणार आहात? कारण त्या ॲक्टच्या अनुषंगाने लोकल बॉडीला उपविधी करायचा अधिकार आहे. ते आत्तापर्यंत आणलेले नाही आणि धर्मादाय ट्रस्टच्या खाली जे हॉस्पीटल चालतात, त्याबद्दल महापालिकेच्या शासनाच्या जीआर प्रमाणे काय फॅसिलीटी आहेत आणि त्याची काय पूर्तता केली पाहिजे याच्याबद्दल सांगावे.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. जे धर्मादाय हॉस्पीटल्स आहेत, त्यांना परवानगी देताना त्यांना शासनातर्फे बंधन असते की, त्यांनी ठराविक पर्सेंटेज पेशंट, १० टक्के असेल किंवा १५ टक्के असेल एक बिलो पॉवर्टी लाईन यांना फ्री ऑफ कॉस्ट सर्विस त्यांनी द्यायला पाहिजे अशा प्रकारे हॉस्पीटल आणि त्यांना काय काय सेवा फ्री ऑफ कॉस्ट देणे बंधनकारक आहेत याची माहिती आम्ही डिटेल रिपोर्ट करुन सर्व मा. सदस्यांना आणि लोकप्रतिनिधींना देण्याची व्यवस्था करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझ्या माहितीप्रमाणे हे कोणालाही माहिती नाही. एकतर महापालिकेच्या धर्मादाय ट्रस्टच्या कोणालाही माहिती नाही की, मा. आयुक्तांकडे पत्र दिल्यानंतर आपल्या शहरामध्येपण सातशे बिलो पॉवर्टीचे लोक आहेत. पण ही गोष्ट कोणालाही माहिती नाही. ठिक आहे, आत्ता तुम्ही सांगितले की, जी आर आहे आपल्याही आरोग्य केंद्राच्या बाहेर या या चेरीटेबल जे हॉस्पीटल आहेत यांच्याकडे महापालिकेचे एवढे टक्के आहेत. बिलो पॉवर्टी यांनी झाल्यास मा. आयुक्तांना किंवा सभासदांना भेटावे असे जरा येऊ द्या. लोकांची गरज आहे. आज लोकांना उपचार करणे फार कठिण झालेले आहे. गरीब लोकांना तर मरणच आहे. पण ही गोष्ट कोणाला माहिती नाही. आणि ही गोष्ट तुम्ही माहिती करुन दिली पाहिजे. पण आजपर्यंत मला हे पत्र मिळाले नाही कधीही दिलेले नाही ही गोष्ट शासनानी करावी आपण फक्त चेंबर घेतलेले आहेत. एसीमध्ये बसतो. बाकीची फॉर्मेलिटी आपल्याला करायची नाही असे दिसते म्हणून शासनाच्या जीआर प्रमाणे काही असेल त्याची ताबडतोब दर्शनीय भागामध्ये, प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये अशी या-या ट्रस्टचे आपले १५ टक्के रिझर्व्हेशन आहे. मा. आयुक्तांना किंवा यांना भेटा अशी नोंद त्या आरोग्य केंद्रामध्ये झाली पाहीजे आणि उपविधी आपण कधी आणता?

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, एक डिस्टर्ब करतो. आपल्या समाज विकास विभागाकडून आपल्या अनेक स्कीममध्ये बिलो पॉवर्टी लाईनच्या कुटुंबाच्या रजिस्ट्रेशन संदर्भामध्ये नोंद आहे. पल्स पोलिओ, सगळ्या स्किममध्ये आहेत. माझ्याकडे पुस्तिका आहे असे असतानासुध्दा समाजविकास विभागाकडुन आत्तापर्यंत बिलो पॉवर्टी लाईनच्या ज्या फायनल लिस्ट झाल्या आहेत, त्या डिपार्टमेंट टू डिपार्टमेंट ना त्या कुठल्या अधिका-यांनी मागितल्या ज्या डिपार्टमेंटचे ते अधिकारी आहेत, त्यांनी त्या दिलेल्या आहेत. ज्यामुळे डिपार्टमेंटकडे लिस्टच आली नाही तर साहेब, मी पल्स पोलिओचे रिपोर्ट बघितले, आडवे तक्ते आहेत. त्याच्यामध्ये बीपीएल, नो सरळ लिहीतात. रिमार्क मारतात आणि वैद्यकीय अधिकारी फायनल करुन तुमच्याकडे पाठवतात. मी आपल्याला विनंती करतो की, या सगळ्या रिमार्क तुम्ही मागवा. आणि कुठल्या अधिका-याने कुठल्या अधिकारात त्यांनी त्याचे रिमार्क मारले ते विचारा. कारण त्याच्याकडे ती लिस्टच नाही. ना आपल्या समाज विभागाने दिलेली आहे. त्यांना काय अडचण आहे. रजिस्टर होऊन आपल्याकडे रेडी होऊन आले आहे. आत्ता माहितीचा अधिकार जरी आला तरी त्याच्या खाली लिहिलेले असते आणि मोठ्या कार्यालयात तर सरळ असते. मी अर्जदार हा दारीद्र्य रेषेखालील आहे किंवा नाही माहितीचा अधिकार सगळ्या डिपार्टमेंटला आहे.

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण उपविधी कधी सादर करणार आहोत याबाबत..........

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तीन महिन्यात सादर करणार.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही त्यांना निर्देश द्या की, जे धर्मादाय हॉस्पीटल आहेत, त्याची लिस्ट आपल्याकडे ठेवा. त्यांचे नियम काय? जे बिलो रेषेमधील आहेत, त्यांना काय फायदे आहेत ते तुम्ही आपल्या महानगरपालिकेत लिहिण्याकरीता तुम्ही त्यांना आदेश द्या.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त महोदय, आरोग्य विभाग मे एक चर्चा चली है तो मै आपके यह कहना चाहता हूँ की, पिछले सात आठ महिने मै आरोग्य विभाग मे जो मेडीकल सुप्रीटेंन्डेंट, डॉक्टर, चार बार पोस्ट बदली जा चुकी है। डॉ. लहाने, उसके बाद डॉ. फडके, डॉ. चकोर, उसके बाद डॉ. फडके और डॉ. पडवळ। तो इतनी बार बार परिवर्तन करने से डिपार्टमेंट को जो भी कारवाई करनी होती है, वो कारवाई ढंग से नही हो पाती है। मेरी यह प्रार्थना है की, जो अब डॉ. पडवळ इनको चार्ज दिया है, उनको बराबर रखकर वही पॉलिसी को पर्स्यु करे। तो वो जो जवाब आज नही दे पा रहे है, क्योकी उनको जॉईन्ट करके दस बारा दिन हूए है। जवाब नही देने का कारण यही है की, उनको मालूम नही है की, पहले क्या हूआ है। तो रिक्वेस्ट यह है की, अधिकारी का बदली इतना फास्ट नही किया जाए।

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, गेल्या चार-पाच दिवसापासून पूर्ण महाराष्ट्रामध्ये पावसामुळे ठिकठिकाणी किती नुकसान झाले या संदर्भातील बातम्या आपण वाचतो आपल्या शहरामध्येही अतिशय वाईट परिस्थीती निर्माण झाली आणि सभागृहाच्या सर्व सन्मा. सदस्यांना जाण आहे, पूर्ण माहिती आहे की, या शहरामध्ये जास्तीत जास्त जे नुकसान झाले, त्याचे कारण आहे की, नाल्यांमध्ये माती भराव आणि तो आजही थांबलेला नाही. या ठिकाणी मी शाळा आणि खेळाच्या मैदानासाठी विकास आराखड्यात राखीव असलेल्या भुखंडावर मातीचा बेकायदा भराव केल्याप्रकरणी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माजी महापौर तथा भाजपाचे जिल्हाध्यक्ष, सन्मा. नगरसेवक श्री. नरेंद्र मेहता यांच्यावर गुन्हा दाखल झाल्याच्या चार-पाच वृत्तपत्रांमध्ये बातम्या आलेल्या आहेत. मला वाटते याच्या संदर्भात मा. महापौर साहेब, आपणालाही पूर्ण माहिती आहे. कमिश्नर साहेब, अशा लोकांवर एमआरटीपी चा गुन्हा दाखल झाला आहे, याची आपणालाही पूर्ण माहिती आहे. एका शहरामध्ये एखाद्या सर्वसामान्य माणसाने किंवा एखाद्या व्यापाऱ्याने जर अशा पध्दतीचे काम केले तर आपण समजून घेऊ. पण एका पक्षाच्या जबाबदार नेत्याने या शहराच्या माजी महापौरांनी आणि या सभागृहाच्या सन्मा. नगरसेवकाने वारंवार अशा पध्दतीचा माती भराव या शहरामध्ये करणे, वारंवार आपल्या कुठल्याही फायद्यासाठी या शहराच्या नुकसानाच्या विषयावर काम करणे आणि वारंवार गुन्हे दाखल होऊन सुध्दा त्यांच्यावर कुठल्याही पध्दतीची ठोस कारवाई न होणे, ही या शहरासाठी अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे, अतिशय दुर्देवी गोष्ट आहे आणि म्हणून मा. महापौर साहेब, तुम्हाला आणि मा. कमिश्नर साहेब, आपणालाही या ठिकाणी मुद्दाम सांगतो की, अशा लोकांवर जे जबाबदार लोक आहेत, त्या लोकांनी अशा पध्दतीचे वर्तन करणे हे शहरासाठी अतिशय घातक आहे म्हणून आपण आत्तापर्यंत काय कार्यवाही झाली? त्यामध्ये नेमके कोण कोण आहे? कुठल्या पध्दतीची कारवाई झाली? आणि याच्यापुढे जाऊन काय कारवाई होणार? या सभागृहाचा नगरसेवक म्हणून जर कोणी अशा पध्दतीचे काम करत असेल, तर मा. आयुक्त साहेब, आपण काय कारवाई करणार आहात याची या सभागृहाला माहिती द्यावी अशी मी या ठिकाणी नम्र विनंती करतो.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, खरे तर मी खेळीमेळीने हा विषय घेतला होता. म्हणून मी चर्चा केली नाही.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण बोललात की, सभा ही सभेच्या नियमाप्रमाणे चालायला पाहिजे आत्ता हे मध्ये विषय तुम्हाला चालतात का?

**संजय पांगे :-**

वर्तमानपत्रातील बातमीवर सभागृहात विषय चालू शकतो?

**लक्ष्मण जंगम :-**

का चालू शकत नाही? यापूर्वी या सभागृहामध्ये असे विषय झाले नाहीत, तुम्ही उपस्थित केले नसतील तर सांगा.

**(सभागृहात गोंधळ)**

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही ज्यावेळी आरोप करता मग ऐकायचीही तयारी ठेवायची.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

माजी महापौर साहेब, आपणसुध्दा परवानगी घेऊन उठायला पाहिजे होते. तुम्ही जेव्हा सभेचे नियम सांगता तेव्हा तुम्ही उठताना मा. महापौरांची परवानगी घेतलेली नाही.

**(सभागृहात गोंधळ)**

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, हा एमआरटीपी गुन्हा पोलिसांनी दाखल केलेला नाही. महापालिकेच्या कर्मचा-याने दाखल केलेला आहे. महापालिकेच्या कर्मचा-यांना जाणीव असायला पाहिजे की, ते कोणावर दाखल करतात. त्याच्याकडे काय पुरावा आहे? मी इकडे या शहरात काय देशातच नव्हतो. आणि मी विदेशात जाऊन सांगितले की, तिकडे दोन डंपर माती टाका? तुम्ही तो चुकीचा राजकीय दबावाखाली हा गुन्हा दाखल केलेला आहे. मी एका कानाने ऐकले, दुस-याने ऐकले. कारण ती म्हण आहे, जब बदनामी होती है, तो समझ लो की, तरक्की होने वाली है। म्हणून मी कोणाला घाबरत नाही. पण तुम्ही ते सिध्द करुन दाखवल्यानंतर गुन्हा दाखल करायला पाहिजे. तुम्ही एका लोकप्रतिनीधीवर गुन्हा दाखल केला आहे. तुम्ही माहिती घ्या, चौकशी करा. मग एक नाही दहा दाखल करा, आम्ही तयार आहोत. पण जमिनीशी काही देणे-घेणे नाही. मागच्या वेळी पण जनता पक्षाच्या एका कार्यकर्त्याने सांगितले होते की, तहसिलदाराने गुन्हा दाखल केला त्याचे काय झाले? शेवटी इन्वेस्टीगेशनमध्ये माहिती पडले की, नरेंद्र मेहताचा काहीच संबंध नाही. मी या देशात नव्हतो आणि देशात नसताना तिकडे जाऊन माती टाकणार? आणि कोणी एका तक्रारदाराने सांगितले की, नरेंद्र मेहता आहे. उद्या सांगितलं की, मा. महापौर श्री. तुळशीदास म्हात्रे साहेबांनी सांगितले. तर काय त्यांच्यावरही दाखल करायचा आहे? अधिका-यांनी हे जाणीव केले पाहिजे. कागद असायला पाहिजे. कागद नसतील तर पोलिसांना कमीत कमी निनावी गुन्हा दाखल करा. याची चौकशी करा आणि जो दोषी असेल त्यांच्यावर दाखल करा. आमची तर अशी मागणी आहे की, ज्या अधिका-याने त्याच्या अधिकाराचा गैरवापर केला आहे, त्यांनी विदाऊट पुरावा, विदाऊट कागदपत्रे आमच्यावर दाखल केला आहे. त्यांच्यावर कार्यवाही करा. मी तर मानहानीचा दावा करणारच आहे. त्यांना कोर्टात घेऊन जाणारच आहे. पण शेवटी एक लोकप्रतिनिधी, मी असू द्या, कोणीही असू द्या, तुमच्याकडे कागद अशतील, पुरावे असतील तर तुम्ही एक नाही, दहा करा. तिकडे कागद नाही, पुरावे नाहीत, काही देणे घेणे नाही आणि माझ्या नावावर दाखल. मी या देशातच नाही. पेपरमध्ये केवढी बदनामी केली.

(सभागृहात गोंधळ )

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुमच्यावर जे ्आरोप वर्तमानपत्रामध्ये आलेले आहेत, त्यासंबंधी या नगरसेवकांनी, नक्की काय घडलेले आहे, हे विचारण्याचा अधिकार नाही?

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही माहीती घेतली असती तर आम्ही स्वागत केले असते. सन्मा. सदस्यांनी काय भुमिका मांडली? एखाद्या पत्राच्या पदाधिका-यांनी असे करणे खूप गंभीर आहे, असे आरोप केले आहेत. त्यांनी माहीती मागितली नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, मी असे बोललो की, याच्यापूर्वी ही यांच्यावर अशा पध्दतीचा गुन्ही दाखल झाला होता. आत्ता ते बोलले की, आम्ही कोर्टामध्ये घेऊन जाणार आहे. याच्या अगोदरच्यांना नेले की नाही हे मला माहिती नाही. नाहीतर तुम्ही आत्ता दोघांना सोबतच घेऊन जा. पहिल्या वेळेला ज्यावेळी तुमच्यावर असा आरोप झाला, त्यावेळी तुम्ही कोर्टामध्ये जायला पाहीजे होते म्हणजे पुढच्या वेळेला तुमच्या विरोधात तशा पध्दतीची हिम्मत कोणी केली नसती पण तुम्ही पहिल्या वेळेला सहन केले याचा अर्थ तुम्ही पहिला गुन्हा केला होता आणि म्हणून या पेपरमध्ये.............

**नरेंद्र मेहता :-**

माझे राजकरण झालेले नाही. तुम्हाला अरेस्ट केले आहे मला नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

मी तुम्हाला असे म्हणतो की, तुम्ही निश्चितपणे शांततेने तुमचे म्हणणे मांडु शकता माझी तुम्हाला विनंती आहे की, पहिल्यावेळी तुमच्यावर गुन्हा झाला अशी बातमी आहे किंवा तुमच्या सहका-यांवर गुन्हा दाखल झाला अशी बातमी आहे आणि आत्ता तुम्ही जर बाहेरच्या देशात राहीले, तुम्ही व्यापारी आहात, फार मोठे गृहस्थ आहात, तुम्ही बाहेरच्या देशामधुनसुद्धा इकडे सुत्रे हलवू शकता ते नाकारता येत नाही. तुम्ही किंवा तुमच्या हस्तकांमार्फत................

**नरेंद्र मेहता :-**

मा. उपमहापौर साहेब, आत्ता हे आरोप चालले आहेत माहिती चालली नाही. हा प्रशासनाचा विषय आहे. हा सभागृहाचा विषय नाही.

**(सभागृहात गोंधळ)**

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, मी असे बोललो की, सन्मा. सदस्यांच्या बाबतीमध्ये सर्व पेपरला अशी बातमी आहे. मग याचे नक्की खरे काय? मला असे वाटते, आत्ता त्यांनी सांगितले की, ज्या अधिका-याने याच्यामध्ये त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी, कार्यवाही करण्यासाठी जे जे पुढे आले, त्या सर्वांना मी कोर्टात घेऊन

जाणार मला अशी माहिती आहे की, कालचा हा गुन्हा दाखल करण्यासाठी नवनिर्वाचित मा. आयुक्त साहेबसुद्धा एस.पी. साहेबांशी बोलले कदाचित माझी माहिती चुकीची असु शकते, अपूर्ण असु शकते. जर तसे काही नसेल तर तुम्ही खुलासा करु शकता. पण जर असे काही झाले असेल तर तुम्ही त्यांना कोर्टात खेचणार हे तुम्ही सांगितलेले आहे. पण आम्हाला या सभागृहाला प्रशासनाकडुन याची व्यवस्थितरीत्या माहिती पाहीजे. म्हणून हा प्रस्ताव आम्ही उपस्थित केला आहे. तुम्ही त्याच्यामध्ये किती इन्व्हॉल्व आहात. एक गोष्ट निश्चित आहे की, एखादा गुन्हा दाखल झाला तर तो गुन्हा दाखल झाल्यावर लोक म्हणतात की, तसे घडले. कोर्टाने तुम्हाला आत्तापर्यंत दोषी ठरवले असे आम्ही म्हणत नाही म्हणूनच आम्हाला प्रशासनाकडुन माहिती पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, या सर्व प्रकारानंतर सभागृहामध्ये एक भाग झाले की, पेपरच्या बातम्यांवरुन सभागृह चालू शकते हे आपण दाखवून दिले. या अगोदर शहरातील अत्यंत महत्वाच्या विषयावर आम्ही जेव्हा सांगितले की, पेपरच्या न्युजवर चर्चा करता येत नाही. आम्ही त्यावेळेला इकडे उल्लेख केला तेव्हा तुम्ही सांगितले की, पेपरच्या न्युजवर सभागृहामध्ये चर्चा करता येत नाही. हे तुम्ही अगोदर सांगितलेले आहे. तुमचा सदस्य उठला तर पेपरची न्युज चालते आणि आम्ही विरोधक बोलायला लागलो की, पेपरची न्यूज चालत नाही हा न्याय चालणार नाही तुम्ही तोसुद्धा न्याय लावला तर माझ्याकडे आत्ता २५ न्यूज आहेत. मला बोलायला देता? शहरातील महत्वाच्या विषयावर न्यूज आहेत अधिका-यांच्या भरतीवर न्युज आहेत.

**मा. महापौर :-**

तुम्ही बसुन घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, दिल्ली से गल्ली तक कौन अंदर है, कौन बाहर है यह सबको मालुम है। यह पार्टीवाले हमपर आरोप लगाते है, यह उनको शोभा नही देता है। दिल्ली से गल्ली तक उनके सब नेता अंदर है और हम पर आरोप लगाते है पहले खुद आचरण देखो बाद मे बोलो म्हणजे या देशात काय चाललेले आहे ते तुम्ही बघा पहले अपनी गरीमा झाककर देखो।

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, हे जे बोलले की, गल्ली ते दिल्ली हे प्रोसिंडींगमधून काढुन टाका आणि त्यांना माफी मागायला लावा त्या नेत्यांबद्दल बोलायची त्यांची योग्यता नाही.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही प्रोसिडींगमधुन काय काय काढणार आहात? प्रत्येक वेळेला हे काढा, ते काढा म्हणजे तुमच्यावर आले की, प्रोसिडींगमधुन काढा आणि बाकी विषय प्रोसिडींगमध्ये ठेवा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही भारतीय जनता पक्षाचा उल्लेख केलेला आहे.

**मा. महापौर :-**

महानगरपालिकेशी संबंधीत असलेले प्रश्न विचारा. बाकीचे प्रश्न विचारायची गरज नाही. श्री. मिलन म्हात्रे आपण काय बोलता? या ठिकाणी हा जो प्रश्न होता हा बोलण्यासाठी एवढ्यासाठी वर्तमानपत्रामध्ये बातमी आलेली आहे. या शहरामध्ये इतके पाणी भरले होते. तुम्हाला माहिती आहे, या नाले बांधकामामुळे भरलेले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली नव्हती तरीसुद्धा एवढे पाणी भरले. अनेक लोकांची घरे पाण्याखाली गेली. तुम्हाला माहिती नसेल तर बोलू नका.

**मिलन म्हात्रे :-**

सगळे नाले फिरुन बघितले. कोणाला सुद्धा माहिती नाही. या अगोदर तुमचे सफाईचे ठेके तीन महिने थांबले आहेत का? तुमच्याकडे उत्तर आहे का? तुमच्याच पक्षाने ठराव केला आणि केलेले ठराव रद्द केले. आणि नालेसफाई बद्दल बोलू नका. याचे सगळयाचे पाप सत्ताधारी पक्षाचे आहे. तुम्ही ठराव केले आहेत. माती भराव करायला तुम्ही प्रोत्साहन दिले. आणि बहूतेक जागा तुमच्या लोकांच्याच आहेत. तुम्ही हे बोलू नका.

**मा. महापौर :-**

माझ्या असत्या तर मी अनेक पत्रव्यव्हार केले असते का ?

**मिलन म्हात्रे :-**

मी तुम्हाला सात बारा उता-यासकट सांगतो. या मातीच्या भरावाला केसेस करायला लागल्या तर सभागृहातील ७० टक्के नगरसेवक आतमध्ये जातील.

**नरेंद्र मेहता :-**

आपण ज्या बंगल्यात राहता, बाजूला साईकृपा कॉम्प्लेक्स आहे.त्या बंगल्यामध्ये आणि साई कॉम्प्लेक्सच्या मध्ये एक डी.पी .रस्ता आहे. त्या डी.पी रस्त्याच्या एफ.एस. झेड साईकृपा कॉम्प्लेक्सने वापरलेला आहे आणि आपण काय केले कॉम्प्लेक्स जो रस्ता वापरतो, तो रस्ता आपल्या बंगल्याच्या बाउन्ड्रीमध्ये घेतलेला आहे. ती महापालिकेची प्रॉपर्टी आहे. तुम्ही टाउन प्लानिंगला विचारा. ते उत्तर देतील.

**मा. महापौर :-**

तुळशीदास म्हात्रे हा नविन नेता नाही. या पक्षामध्ये मी आयुष्य घालवले. कुठली चूक न करणारा मी माणूस आहे. भडकवण्याचे काम आम्ही करत नाही. भडकवण्याचे काम तुम्ही करता. मी जनतेसाठी माझ्या जागेतून रस्ता केला आहे.

**नरेद्र मेहता :-**

तुम्ही एम. आर.टी.पी. दाखल केले. आम्ही एक शब्द बोललो का? तुम्हाला योग्य वाटले ते प्रशासनाने केले. आम्हाला न्याय मागायला जे योग्य वाटेल ते आम्ही करू.

**लक्ष्मण जंगम :-**

हा विषय या ठिकाणी मुद्दाम सांगण्याचे कारण, मा.उपमहापौर साहेब, तुम्ही लक्ष देऊन ऐकले तर बरे होईल. विषय असा आहे, वॉर्ड क्रं. ५१ आणि ६१ ची परिस्थिती तुम्हाला माहिती आहे. त्या वॉर्डाचे सन्मा. नगरसेवक पाच वर्षे हे होते. पॅनल सिस्टम होती, तीन नगरसेवक होते. त्याच्यापैकी अर्धा वॉर्ड होता, आत्ता डबल वॉर्ड आहे. एक सेव्हन चॅनल आहे, त्याच्यावर रोज आमची नाहक बदनामी चालू असते इथे पाणी भरले, नगरसेवक कुठे गेला म्हणजे एखाद्या सरळ माणसाने काम करणाऱ्याच्या पाठीशी अशा पद्धतीचे आहे या सभागृहाच्या आत्ता निश्चित ध्यानात आले असेल की, तुमचे काय चुकले आहे माझे काय चुकले आहे ते आपण दोघे बसुन बघु या पद्धतीने बसून बघणाऱ्यांनी या शहराचे वाटोळे लावले आहे असा माझा तुमच्यावर आरोप आहे. तुमचे कोणी काय चुक केली ते या सभागृहाला करु द्या.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, प्रशासनाने माहिती देण्यापूर्वी मा. आयुक्त नविन आलेले आहेत. बरेचसे सदस्य त्यांना भेटले नाहीत. दोन मिनिटे मा. आयुक्तांनी स्वतःची ओळख आणि मनोगत व्यक्त केले तर बरे होईल.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, दि.१८ जूलै २०११ रोजी आरक्षण क्र.२५९ आणि २६०, जे माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान आणि प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान अशी दोन आरक्षणे आहेत ज्याच्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीचे म्हणजे सात बारावर नाव आहे, असे भुमापन क्र.६१ पोटहिस्सा १६, ६१पोटहिस्सा २२, ६२पोटहिस्सा २(अ), ६२पोटहिस्सा ७(ड), ६२पोटहिस्सा १०, २६५पोटहिस्सा १३(ब), १६५पोटहिस्सा ४, आणि १६५पोटहिस्सा ४ मौजे नवघर हे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या डायरेक्ट ओनरशिपचे किंवा जॉईंट ओनरशिपचे असे भुमापन क्रमांक आहेत या भुखंडावर माती भराव चालू असल्याचे श्री. सुदेश सुदेवन नावाच्या व्यक्तीने प्रभाग अधिकारी क्र.०३ यांना दुरध्वनी वरुन माहिती दिली आणि त्यांनी त्वरीत नवघर तलाठी श्री. डी.बी. अहिरे यांना कळवले आणि श्री. डी.बी. अहिरे आणि त्यांचे सहकारी असे दुपारी दोन वाजून पंचेचाळीस मिनिटांनी सदर भुखंडावर गेले असता काही इसम माती भराव करताना दिसले माती भराव करणाऱ्या इसमांना डंपर चालक आणि जे.सी.बी. यांना विचारले असता त्यांचे नाव होते श्री. किशोर दिलीप पिठकर, वय वर्षे २५ राहणार गिरजाबाई चाळ, दारखाडी एस.व्ही. रोड, दहिसर या व्यक्तीला विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की, म्हणजे तक्रारीतच आहे, माजी महापौर श्री. नरेंद्र मेहता यांचे स्वीय सहाय्यक श्री. प्रशांत केळुस्कर व श्री. सुरेश शेट्टी यांनी त्यांस माती भराव करण्यांस सांगितलेले आहे. त्यामुळे त्यांना म्हणजे श्री. किशोर पिठकर आणि त्यांच्या ताब्यात असलेले डंपर क्र.एम.एच.०४, EY-७३४०, त्यावर चालक श्री. संतोष पंढरीनाथ सुर्यवंशी, राहणार चांदीवली, मुंबई डंपर क्र.एम.एच.०४,डीडी-८३३७ व त्यावरील चालक श्री.सोनू विश्वनाथ दास राहणार दहिसर, डंपर क्र.एम.एच.०४, EY-७३५१, त्यावरील चालक श्री. संजय मंगल सयरीन, राहणार शुल्कसिंग चाळ, एस.एम. दुबे रोड, रावळपाडा, दहिसर, डंपर क्र.एम.एच.०४, EY-७३९५, त्यावरील चालक श्री. शहिद अली हसन शाह, रुम नंबर ०२, दादा चाळ, केतकी पाडा, दारखाडी, दहिसर डंपर क्र.एम.एच.४३, ईएल-९९०७, चालक श्री. आत्माराम उत्तमराव शिंदे, राहणार दहिसर पूर्व, डंपर क्र.एम.एच.०४, ई-८५५५, चालक श्री. ओमप्रकाश बरसाते, राहणार दहिसर पूर्व, जेसिबी क्र. एम.एच.४३,८३१ चालक श्री. भिमराव दुःखीराम वर्मा, राहणार भांडुप (पश्चिम), मुंबई, जेसिबी क्र.एम.एच०६,ए.एफ-३८६६ आणि एवढी वाहने म्हणजे ऑल टुगेदर आठ वाहने, सहा डंपर आणि दोन जेसिबी, असे ताब्यात घेतले आणि त्याच्यामध्ये एफ.आय.आर. मध्ये या सर्वांची नावे म्हणजे त्याच्यामध्ये श्री. नरेंद्र मेहता, श्री. प्रशांत केळुस्कर, श्री. सुरेश शेट्टी त्याचप्रमाणे श्री. संतोष पंढरीनाथ सुर्यवंशी, श्री. सोनू विश्वनाथ दास, श्री. संजय मंगल सेरीन, श्री. शहिदअली हसन, श्री. आत्माराम उत्तमराव शिंदे, श्री. ओमप्रकाश बरसाती, श्री. भिमराम दुःखीराम वर्मा या एकुण दहा इसमांवर अनधिकृतपणे माती भराव करीत असताना भारतीय दंडविधान संहिता कलम ४४८, कलम ३४ सह महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६, कलम ५२,५३,५४ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९५० चे कलम ४७८ आणि महाराष्ट्र जमिन महसुल संहिता अधिनियम १९६६ कलम ४८ पोटकलम ७ अन्वये महानगरपालिकेतर्फे फिर्याद नोंदविण्यात आलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, एका मिनिटात विषय संपवतो. विषय असा आहे की, महापालिकेच्या जागेवर मी जाऊन कशाला सांगु की, तुम्ही भराव करा आणि ज्यावेळी मी देशात नाही तर तिकडुन एवढे पण नाही की

जाऊन तुम्ही महापालिकेच्या जागेवर भराव करा नाव कोणीही वापरत असतो म्हणजे हे खरे आहे, इकडे हसु येईल. एक दिवस एका रिक्षावाल्याने मलाच ठोकले आणि मलाच सांगतो की, मी नरेंद्र मेहताचा माणूस आहे त्यापूढे मी काय सांगु, माझ्याकडे उत्तर नव्हते शेवटी मला हसायला आले म्हणजे कोणीही काही करेल ब-याचशा कार्यकर्त्यांना वाटले की, मी याचे नाव घेतले किंवा नेत्यांचे नाव घेतले तर मला सोडतील. त्या उद्देशाने नाव घेतले आहे. महापालिकेच्या जागेवर भाव करायचा माझा काय संबंध येतो. माझी जागा असेल तर समजतो की, मी गेलो असेन किंवा काय असेल आणि या पावसात कोणीही भराव करत नाही आणि अनेकदा या प्रकारच्या घटना वेगवेगळ्या कारणाने घडत असतात नावे घेतात आणि नंतर नावावर इन्वेस्टीगेशन होतात नंतर माहिती पडते की, याच्यात आमचा काही दोष नाही पण ज्यावेळी आपले अधिकारी नोंद करतात त्यावेळी कमीत कमी आपण मला बोलवले असते आणि विचारले असते की, श्री. नरेंद्र मेहता तुमचे असे असे आहे, त्याच्यामध्ये तुम्ही आहात तुम्हाला पिक्चर क्लीअर झाले असते. अननेसेसरी एवढा सभागृहाचा वेळ, प्रेसमध्ये बातम्या, पोलिस स्टेशनला एन्क्वायरी हे सगळे बेकार होते. त्या जागेशी माझा काय संबंध? आणि तो जो किशोर बोलता तो काळा आहे की, गोरा आहे ते मी बघितले पण नाही. त्या दोन लोकांनी सांगावे की, हा नरेंद्र मेहता आहे त्यापुढे अजुन काय सांगायचे?

**मा. महापौर :-**

या ठिकाणी ज्या व्यक्तींनी नावे सांगितली तो श्री. लक्ष्मण जंगम यांचा वॉर्ड होता. त्यांचे नाव सांगायला पाहिजे होते. अनेकांची नावे सांगायला पाहिजे होती. तुमचेच नाव का सांगितले? तो वेडा होता का?

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, पॉप्युलर व्यक्तींचीच नावे सांगितली जातात.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहब, अभी जो श्री. सुधीर राऊत साहब ने जानकारी दी की, इस धारा के कलम तहत इन व्यक्तीयों के उपर केस दर्ज किया गया है। यह जो केस दर्ज करवाया गया यह मिरा भाईंदर महानगरपालिकेद्वारा करवाया गया की, तलाठी या सर्कल के द्वारा करवाया गया? जरा मै जानना चाहूँगा। यह केस किसके द्वारा दर्ज करवाया गया?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

यह केस महानगरपालिकाद्वारा महानगरपालिका के प्रभाग अधिकारी श्री. वसंत राणेजी ने दर्ज करावाया। उसमे तलाठी भी शामिल है।

**भगवती शर्मा :-**

प्रश्न ऐसा है की, जो जानकारी श्री. सुधीर राऊत साहब ने अब दी की, जो ड्रायव्हर पकडा गया या जो व्यक्ती पकडा गया उन्होंने जो नाम बताये गये उसके आधार पर यह केस दर्ज किया गया है। निश्चित तौर पर इनकी आगे एन्क्वायरी होगी जो दोषी व्यक्ती होगा उसके उपर चार्ज फ्रेम किए जाऐंगे। जो भी दुध का दुध, पानी का पानी होगा। लेकीन अब ऐसे सदन मे चर्चा हुई तो एक शुध्द चर्चा होनी चाहीए। नही की, किसी को धमकी भरे अंदाज मे, अब जैसे सन्मा. नगरसेवक श्री. नरेंद्र मेहताजी ने कहाँ की, मै उनको कोर्ट मे घसीटूंगा। किसी भी अधिकारी के उपर दबाव तंत्र ना वापरते हूए, जो भी है, अब यहाँ पर केस दर्ज करवाया गया। आगे पुलिस अधिकारी, वरिष्ठ अधिकारी, उसकी जाँच करेंगे। और जिसपर आगे चार्ज फ्रेम करने के लिए उपयुक्त लगेगा, उसके उपर चार्ज कीए जाऐंगे। जो निर्दोष होंगे वो छुटेंगे। मेरा यह मानना है की, इस विषय को अब जैसे आपने बताया, अब आपके पास कोई और प्रभाग अधिकारी द्वारा कोई भी ऐसी ॲप्लीकेशन या कोई भी ऐसी चीज प्रलंबित है क्या?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अजूनपर्यंत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, हा विषय जो चालला आहे त्याच्यामध्ये मा. आयुक्त साहेब आपल्याला माझी एक खास विनंती आहे महानगरपालिकेच्या प्रत्येक बांधकामाच्या ठिकाणी किंवा गार्डन म्हणा रस्ते म्हणा, जिकडे-जिकडे लॅन्डफिलींग होते, मातीचा भराव आपण टेंडर काढतो, सगळे काही करतो. जिल्हाधिकारी कार्यालयातील रॉयल्टी तहसिलदार, तहसिलदार, जिल्हाधिकारी यांना मी पत्रव्यवहार केलेला आहे की, ठेकेदार जेव्हा आमच्याकडे माती आणून टाकतो त्याची रॉयल्टी काढतो का? लाखो रुपयांच्या मातीच्या भरावाची रॉयल्टी आपण काढत नाही. स्वतः आपणच जर चोर असू तर तुम्हाला दुस-यांवर केस करायचा अधिकार काय? अशी अनेक प्रकरणे आहेत की, आपल्याकडे डी.पी. रोड गार्डन्स, प्ले ग्राऊंड, सुभाषचंद्र बोस मैदान ४५-४५ लाखाच्या मातीच्या भरावाच्या मी तक्रारी केल्या आहेत. तीच तक्रार मा. जिल्हाधिका-यांकडेपण केली. एक ट्रकची सिंगल रॉयल्टी आपल्या महापालिकेने भरलेली नाही. आपल्याकडे त्याला क्षमापण मिळते. जर मा. आयुक्तांकडे प्रिस्क्राईब फॉर्म जर तुम्ही मा. जिल्हाधिका-यांना भरुन दिला तर आपल्याला त्याच्यात माफी मिळते. ते फॉर्मसुध्दा माझ्याकडे आहेत परंतु, आपल्या संबंधीत विभागातील अधिका-यांना तुम्ही हे खुलासा करुन घ्या की, आपण आत्तापर्यंत जी काही माती खरेदी केली तुम्ही रॉयल्टी, स्वामीत्व धन भरले

का? साहेब, मी जर दोन ट्रक आणले तर मला तहसलिदार रस्त्यावर अडवतो. आम्हाला दंड करतो लाखो, एक-एक करोड रुपयाच्या पॅनल्टीच्या नोटीस आपल्या जिल्हाधिकारी कार्यालयातुन मिरा भाईंदरमधील लोकांवर दिल्या गेल्या आहेत. माझी अशी विनंती आहे की, या विषयाच्या अनुषंगाने जरा त्याची इन्क्वायरी करावी.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेकरीता चार लक्षवेधी आलेल्या आहेत मी अनुक्रमे वाचून दाखवतो. पहिली लक्षवेधी श्री. अनिल दिवाकर सावंत यांची आहे. विषय आहे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये दि.२०/०७/२०११ रोजी होणाऱ्या मा. महासभेसाठी लक्षवेधी. मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवे अंतर्गत पीपीपी तत्वावर चालविण्यात येणाऱ्या बस सेवेबाबत. दुसरी लक्षवेधी श्री. नरेंद्र मेहता यांची आहे त्यांचा विषय आहे, मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलामध्ये सरळ सेवेने ड्रायव्हरची भरती करण्यात आली. सदर भरती करण्यात आलेल्या ड्रायव्हरचे कोणत्याही प्रकारे वाहन चालविण्याचा अनुभव नाही त्यामुळे त्यांच्या हातुन मोठ्या प्रमाणावर अपघात होऊन मोठे नुकसान होईल अशी शक्यता आहे. तिसरी लक्षवेधी श्रीम. मिरादेवी रामलाल यादव यांची आहे. विषय आहे, जनता नगर वॉर्ड क्र.७६ मध्ये तन्वी कन्स्ट्रक्शन द्वारे खोदकामाबाबत चौथी लक्षवेधी श्री. प्रशांत भगवंत पालांडे यांची आहे. त्यांचा विषय आहे मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये दि. १४/०७/२०११ रोजी पावसामुळे नागरीकांच्या झालेल्या प्रचंड नुकसानाबाबत अशा अनुक्रमे चार लक्षवेधी आलेल्या आहेत. चारही लक्षवेधी मी मा. महापौरांकडे सुपूर्द करतो.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, माझी जी लक्षवेधी आहे ती श्री. प्रशांत पालांडे साहेबांच्या "ज" खाली विषय आहे त्याच्यामध्ये समाविष्ट करावी आत्ता घेतली नाही तरी माझी काही हरकत नाही.

**मा. महापौर :-**

श्री. अनिल सांवत यांची लक्षवेधी घेण्यात आलेली आहे आणि बाकीच्या फेटाळण्यात आलेल्या आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आपण लक्षवेधी फेटाळली त्याच्याबद्दल माझी हरकत नाही. आपला अधिकार आहे मी या पक्षाचा गटनेता आहे. श्रीम. मिरादेवी यादव यांनी जी लक्षवेधी दिलेली आहे दहा दिवसांपूर्वी त्याच बिल्डरमुळे अकरा लोक दगावले जिवहानी झालेली आहे. त्याच बिल्डरकडुन पुन्हा बाजूच्या प्लॉटमध्ये भरणी होते आहे. त्यांनी पत्रव्यवहार केलेले आहेत. पत्रव्यवहार करुन आपल्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी.........

**मा. महापौर :-**

भरणीबद्दल आत्ता काही बोलू नका भरणीबद्दल बराच विषय झालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही सत्ताधारी पार्टी आहात तुम्ही लक्षवेधी मांडायची नसते. लक्षवेधी मांडण्याचा अधिकार विरोधकांना असला पाहिजे तुम्ही सत्तेमध्ये आहात.

**(सभागृहात गोंधळ)**

**मिलन म्हात्रे :-**

विषयपत्रिकेवर सत्ताधारी पक्षाच्या तीन लक्षवेधी आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या बिल्डरमुळे अकरा लोकांचा जीव गेलेला आहे आणि तुम्ही त्याला महत्व देत नाही? तुम्ही वाचून तर घ्या लोकांना याचे महत्व कळू द्या. तुमचे असे मत आहे की, या झोपडपट्टी मध्ये पुन्हा भिंत कोसळली पाहिजे, लोक मेले पाहिजे नंतर सभागृहात विषय घेणार?

**मिलन म्हात्रे :-**

गेल्या सभेतील लक्षवेधीची पूर्तता झाली का?

**मा. महापौर :-**

तुम्ही सभेमध्ये वेळ घालवू नका बसून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही ही लक्षवेधी वाचा एवढी महत्वाची लक्षवेधी आहे तुम्ही भ्रष्ट्राचाराचा आरोप करता मा. सभागृहामध्ये सत्ताधाऱ्यांनी भ्रष्टाचाराच्या विरोधात बोलायची गरज नाही.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, ते कोणाला भ्रष्टाचारी बोलतात? कोणी भ्रष्टाचार केला आहे?

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. महापौर :-**

तुम्ही वारंवार सांगुनसुध्दा का बसत नाही?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, तुम्हाला रिक्वेस्ट आहे की, आपण कमीत कमी ही लक्षवेधी वाचावी. सभागृहाला कळु द्या. तुम्ही माती भरावाच्या एक तास घेतला.

**प्रभात पाटील :-**

लोकांना शिस्तीचे धडे देता स्वतः शिस्त पाळा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्ही दुसऱ्यांना सभेचे नियम शिकवता आणि मा. महापौर तुम्हाला बसायला सांगतात तर तुम्ही बसत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तिकडे अकरा लोक मेले अजून लोक मरायची तुम्ही वाट बघता?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

कोणती लक्षवेधी वाचायची तो अधिकार मा. महापौरांचा आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही बोलतो की, फक्त ही लक्षवेधी वाचावी सभागृहाला कळू द्या. त्यांच्या प्रभागातील विषय आहे. तिकडे अकरा लोक मेले त्याला अजून धोका आहे.

**मा. महापौर :-**

सभागृहाच्या नियमाप्रमाणे आपल्याला मी वारंवार सांगुनसुद्धा आपण बसत नाही. आपले वाक्य सुरु करता म्हणून आजची सभा संपेपर्यंत आपल्याला मी सस्पेंड करत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमच्या हातात हेच राहिलेले आहे. तुमच्या हातात काय आहे? या सभागृहामध्ये एवढी मेजोरीटी असून तुम्ही असा विषय आणता. अकरा लोक मेले त्याची तुम्हाला सहानुभुती नाही आणि मला निलंबित करता.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, कदाचित आपल्याला माहिती नाही, त्या भिंती कोसळल्यानंतर अजून दोन भिंती तीन दिवसापूर्वी त्याच जागेवर कोसळल्या आहेत आणि या प्रकारची घटना परत घडु नये आत्ता दोन अजून कोसळल्या अजून किती कोसळण्याची वाट बघायची?

**मा. महापौर :-**

नगरपालिकेने त्यांच्यावर कायदेशीर गुन्हा दाखल केला आहे. माहिती असून मुद्दाम विषय घडवून आणायचे आपण सभागृहाच्या बाहेर जा. सभा संपेपर्यंत आपण आतमध्ये यायचे नाही.

**भगवती शर्मा :-**

उनको सस्पेंड किया है। तो कारवाई करो।

**अनिल सावंत :-**

सस्पेंड केल्यानंतर नियम काय आहे?

**नगरसचिव :-**

महापालिकेच्या सिक्युरीटी गार्डमार्फत..........

**अनिल सावंत :-**

सिक्युरीटी नाही की काय?

**नगरसचिव :-**

महापालिकेच्या गार्डमार्फत काढले जाते.

**अनिल सावंत :-**

मग बाहेर काढा काय झाले? सभागृहाचा वेळ वाया जातो आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे आपण जे सस्पेंड केले ते कुठल्या विषयावर केलेले नाही आणि आपण सस्पेंड केले तर एक चुकीचा मॅसेज जाईल आपण ते मागे घ्यावे. कारण ज्या विषयावर ते बोलतात ज्या विषयावर त्यांनी मागणी केलेली आहे, अकरा लोक मृत्यु पावले आहेत, त्याच्यावर चर्चा व्हायला पाहिजे. आणि अशा विषयावर तुम्ही सस्पेंड करणार तर एक चुकीचा मॅसेज शहरात जाणार आहे.

**मा. महापौर :-**

या विषयाबद्दल सर्व नागरीकांना माहिती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तो विषय नाही. त्याच्या बाजूला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

अजून दोन भिंती पडल्या आपण काय केले?

**मा. महापौर :-**

सभागृहामध्ये नेहमी टाईमपास कसा करायचा हे त्यांना माहिती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही करत नाही जी कारवाई तुम्हाला करायला पाहिजे तो विषय सभागृहामध्ये आणता?

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, मा. महापौर साहेबांनी सांगितले तरी सभाशास्त्र कामकाज नियमात असेल ना? त्यांना वाटले की, उद्या सर्वांना करायचे तर करायचे का? काही अपशब्द व्यक्त केला? काय केले?

**नगरसचिव :-**

कामकाजात अडथळा वगैरे आणला तर मा. महापौर पिठासीन अधिकारी............

**नरेंद्र मेहता :-**

काय अडथळा आणला?

**नगरसचिव :-**

मा. महापौरांना विचारा तो त्यांचा निर्णय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

कुठलाही अडथळा आणला नाही. त्यांनी मागणी केलेली आहे की, या शहरात अकरा लोक मृत्यु पावले त्याच्यासाठी ती लक्षवेधी घ्यावी हा अडथळा आहे?

**मा. महापौर :-**

लक्षवेधी फेटाळली म्हणून सांगितल्यानंतर त्यांना इकडे बोलायची गरज होती का?

**नरेंद्र मेहता :-**

त्यांनी आपल्याला विनंती केली की, ही महत्वाची आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही सांगितले की, वाचून दाखवा. तुम्ही घेतली नाही तरी चालेल पण सभागृहाला वाचून दाखवा.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, तुम्हाला लक्षवेधी वाचायला नको?

**प्रभात पाटील :-**

सचिव साहेब, लक्षवेधीच्या संदर्भामध्ये तुमच्याकडे काय तरतुदी आहेत? त्या लक्षवेधी वाचून दाखविण्याची तरतुद तुमच्याकडे आहे की नाही?

**नगरसचिव :-**

मी विषय वाचले आहेत. जी लक्षवेधी स्विकारली जाते ती मी वाचून दाखवतो.

**प्रभात पाटील :-**

या लक्षवेधीचे विषय वाचले? मग तुमची लक्षवेधी. विषय तर वाचला होता, एकच स्विकारायची आहे म्हटल्यानंतर एवढा संपूर्ण गोषवारा वाचण्याची काही गरज नाही. तुमचा जो विषय आहे तो सभागृहाला कळलेला आहे. तेव्हा एवढा गोंधळ करायची काही गरज नाही. आपण कृपा करुन सभागृहाचा वेळपण वाया घालवू नये आणि जी स्विकारलेली लक्षवेधी आहे, तिचे निवेदन करायला सुरुवात करावी. त्यांनी म्हणावे की, यापूढे मी शिस्त पाळेन. बेशिस्त वर्तन करणार नाही अशी त्यांनी ग्वाही द्यावी.

**अनिल सावंत :-**

राईटींगमध्ये द्यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम तुम्ही लक्षवेधी वाचल्यानंतर तुमच्या लक्षात येईल की, जी अकरा माणसे मेली त्या विषयाची लक्षवेधी नाही त्याच बिल्डरचे काम चालू आहे त्याची लक्षवेधी आहे.

**जूबेर इनामदार :-**

सचिवांनी तुमचा विषय मांडल्यांनतर तुमचा विषय संपला चर्चा करुन सभागृहाचा वेळ कशाला वाया घालवता?

**मा. महापौर :-**

अब बाहर जाईए।

**भगवती शर्मा :-**

सचिव साहब, सभा कामकाज मे नियम है क्या, सस्पेंड व्यक्ती वापस खडा होकर बोल सकता है?

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, प्रोसिडींगचा विषय आला म्हणून मी सांगतो. हे १४/०९/२०१० चे प्रोसिडींग आहे. जवळ जवळ नऊ दहा महिन्यांच्या अगोदरचे प्रोसिडींग तयार झालेले नाही. या प्रोसिडींगला नऊ दहा महिने का लागतात?

**मा. महापौर :-**

श्री. मिलन म्हात्रे, आत्ता लक्षवेधीचा विषय चालू आहे. आपण खाली बसून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

हे योग्य आहे का एवढेच बोलतो. नऊ महिन्या अगोदर तुम्ही काय बोलतात ते तुम्हाला माहिती आहे का?

**मा. महापौर :-**

आत्ता तो विषय नाही तुम्ही नंतर बाहेर जाऊन अधिकाऱ्यांना प्रश्न विचारा त्या विषयाला धरुन बोला.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, माझी जी लक्षवेधी आहे चौदा तारखेला पावसाळ्यामध्ये जे लोकाचे नुकसान झाले त्याच्याबद्दल प्रशासनाला पाच मिनिटे उत्तर देऊ द्या.

**मा. महापौर :-**

आपल्याला जी माहिती पाहिजे ती अधिकारी देतील. श्री. ओमप्रकाश अग्रवाल आप सभागृह का टाईम खराब मत करो। आप निकल जाईए।

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

श्री. ओमप्रकाश गारोडीया, तुम्हाला मा. पिठासीन अधिकाऱ्यांनी जर आदेश दिलेले आहेत ते आदेश तुम्ही पाळायला पाहिजे. माजी महापौर श्री. नरेंद्र मेहता यांनीसुद्धा कोणाला तरी निलंबीत केले होते. त्यांनी नियम पाळले होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ज्या ठिकाणी झोपडपट्टी आहे. एक महिला सदस्या लक्षवेधी मांडते. त्यांना तुम्ही मांडु देत नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

कोणती लक्षवेधी घ्यायची हा मा. महापौरांचा अधिकार आहे. त्यांनी एक लक्षवेधी घेतलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही सांगतो की वाचा आम्ही सांगत नाही की घ्या.

**(सभागृहात गोंधळ)**

**प्रभात पाटील :-**

हे ऐकत नसतील तर बाहेर काढा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मा. पिठासीन अधिकाऱ्यांनी दिलेले आदेश पाळणे हे कर्तव्य आहे.

**मिलन म्हात्रे :-**

एवढ्या वेळात दहा लक्षवेधी झाल्या असत्या.

**प्रभात पाटील :-**

आम्ही इथे त्यांचेच ऐकायला आलो आहोत का?

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही एखाद्या सदस्यावर एकदा कार्यवाही केल्यानंतर पुढची अंमलबजावणी प्रशासनाने करायची? कोणी करायची? त्यांनी त्यांचे काम सुरु करावे. सभागृहामध्ये ही चेष्टा आहे का?

**एस. ए. खान :-**

मा. उपायुक्त (मु.) साहेब..........

**आसिफ शेख :-**

आपण असे बोललात की, मा. महापौरांनी रुलिंग दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याचे काम प्रशासनाचे आहे. प्रशासन म्हणजे उपायुक्त नसतात प्रशासन म्हणजे प्रशासनाचा प्रमुख मा. आयुक्त असतात.

**नरेंद्र मेहता :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी असे कोणते भाषण व्यक्त केले की, ज्याच्यावर तुम्ही त्यांना निलंबीत करता?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्ही त्यांचे सहकारी आहात. तुम्हाला त्यांचे काही वादग्रस्त वाटणार नाही. त्यांनी केलेल्या चुका तुम्ही पोटात घालणारच.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांनी असे काय चुकीचे केले, काय वक्तव्य केले की आपण निलंबित करता?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मा. महापौरांचे आदेश पाळायला नको?

**नरेंद्र मेहता :-**

आदेश म्हणजे काय, मा. महापौर काही सांगतील पाळायचे का? उद्या सर्वांना सांगतील की, बाहेर जा मग आम्ही जायचे का?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

शांतता पाळायला सांगायचे नाही? तुम्हीसुद्धा तुमच्या काळामध्ये निलंबीत केले होते.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांनी चुकीचे काय सांगीतले?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्ही केलेले ते बरोबर होते.

**नरेंद्र मेहता :-**

माझ्या काळात एकाही सदस्याला बाहेर पाठवले नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्हाला आदेश दिलेले आहेत तुम्ही ते पाळा.

**मिरादेवी यादव :-**

मा. महापौर साहब, आपके परवानगी से बोलती हूँ। अब जो आठ तारीख को दुर्घटना हुई, उसकी लक्षवेधी नही है। जो दुर्घटना होनेवाली है, वही बिल्डर का काम है और दुर्घटना होने के बाद प्रशासन भागते है। इसके पहले ध्यान क्यों नही देते है? यह महानगरपालिका क्षेत्र मे है, तो ध्यान नही देंगे। इसका जवाब दिजिए। अब कुछ दुर्घटना हो गयी तो आपकी जिम्मेदारी रहेगी। मेरा लक्षवेधी है मेरा नही सुना जाएगा। मुझे भी बाहर निकालिए।

**मा. महापौर :-**

आप अधिकारी के पास गये नही? आपको अधिकारी के पास जाने काय टाईम नही था? उनके पास जाकर आपने माहिती लेना चाहीए। आपका प्रश्न है, आपको मालुम है। लेकीन फिर भी आपने अधिकारी जाँच किया, अपने अधिकारी ने केस भी किया। सब कुछ हो गया। अब आपका फांसी लगाने का विचार है?

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, ती लक्षवेधी फक्त वाचून दाखवा अशी त्यांची विनंती आहे ती पूर्ण करा.

**मा. महापौर :-**

एकदा फेटाळल्यानंतर वाचता येत नाही.

**प्रभात पाटील :-**

साहेब, सभागृहाची काय परिस्थीती आहे सांगु शकतील का?

**मिलन म्हात्रे :-**

आपली एवढी अवकळा आहे की, एका विषयावर मा. महासभा बोलवली जाते. बाकी कुठलाच विषय नाही. प्रशासनाकडे केवढे तरी विषय पेंडींग आहेत. विषयपत्रिका एका विषयावर आहे. ही मिटींग अर्ध्या तासात संपली पाहिजे. लवकर काय तो निर्णय घ्या आणि मिटींग सुरुवात आमचा वेळ फुकट जातो आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, आत्ता मा. आयुक्त साहेबांना आपल्या मा. महासभेचा अनुभव हळूहळू यायला लागला असेल. मा. महापौरांनी रुलिंग दिली आहे. रुलिंग दिल्यानंतर प्रशासनामार्फत अद्यापही कार्यवाही होत नाही. ते तिकडे पुस्तक चाळतात हे या सभागृहात प्रथमच असे होत आहे की, मा. महापौरांनी रुलिंग दिल्यानंतर देखील अद्यापही त्याची कार्यवाही होत नाही. आजच्या सभेचा स्टेटस काय आहे?

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर शहराचे महापालिकेचे आमचे भाजपचे गटनेते ज्यांना संपूर्ण प्रशासकीय सगळ्या बाबींवरचा चांगला अभ्यास आहे आणि म्हणून ते पोटतिडकीने बोलत असतात. आम्हाला कधी कधी कळत नाही की, ते काय बोलतात. आजही त्यांनी श्रीम. मिरादेवी यादव यांची लक्षवेधी उपस्थित करण्यासाठी फार मोठा संघर्ष केला. परंतु साहेब, मला आपल्याला सांगायचे आहे की, कधी कधी कायद्याच्या तरतुदी पलिकडे आपल्याला जाता येत नाही. आपल्यावर पण काही बंधने असतात आपण आपले सहकारी जेव्हा मा. महापौर होते आणि आपल्या शेजारीच बसले आहेत तेसुध्दा आपल्याला या विषयी माहिती देतील. सभागृह नेता म्हणून माझी आपल्याला विनंती आहे आणि या सभागृहाच्या सगळ्यांच्या सहकार्याने मी आपल्याला बोलते की, कृपया गार्ड येऊन आपला अपमान करुन सभागृहाचा अपमान होऊन आपल्याला बाहेर काढण्यापेक्षा आपण जे काही वर्तन इथे केले, असभ्य वर्तन झाले असेल म्हणून कदाचित आपल्याला गार्ड बोलविण्यात येत आहेत. पण हे सगळे प्रोसिजर होण्यापूर्वी माझी विनंती आहे की, आपल्याकडून जर असभ्य वर्तन झाले असेल तर कृपया सभागृहाची माफी मागावी आणि पुढचा अनर्थ टाळावा किंवा आपण स्वतःहून सभागृहातून निघून जावे. माझी आपल्याला विनंती आहे. आपण आमच्यासारखे नगरसेवक आहात म्हणून आपल्याला विनंती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

गैरवर्तन म्हणजे काय?

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, मा. सभागृह नेत्यांनी बोलले की, त्याच्यात गैरवर्तणुक काय केली ते आम्हाला सांगा.

**(सभागृहात गोंधळ)**

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहब, ग्यारह जण की मृत्यु हूई है। ऐसी दुदैवी घटना अपने शहर मे हूई है। उस विषय पर अगर लक्षवेधी आयी है, उसे एक बार पढने का निवेदन किया जा रहा है। यह इस शहर के लिए

बहोत ही दुःखदायी घटना है। उसे एक बार रीड करने मे क्या प्रॉब्लेम है। उन्होंने किसी भी असभ्य शब्द का उपयोग नही किया है, जिसके लिए आप उनको निलंबीत कर रहे है।

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, सभागृहात पान खाणे हे सभागृहाचा अपमान आहे की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

शासकीय कार्यालयामध्ये तंबाखु सेवन वगैरे वर्ज्य आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, या सभागृहामध्ये खास करुन वर बसलेली सगळी मंडळी, मा. पिठासीन अधिकारी आपण इकडे ड्रामा करायला बसलेले नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मघासपासून तुम्ही ड्रामाच करता, दुसरे काय आहे? आम्ही सभागृहात येऊन चर्चा करायची नाही मग काय करायचे? चर्चा केल्यावर बाहेर काढाल म्हणजे काय चालले आहे?

**लक्ष्मण जंगम :-**

सगळे तुमच्याच मताने झाले पाहिजे असे होत नाही. काय कार्यवाही करता ती पटकन करा. प्रशासनाला सांगा. किती वेळ वाया घालवता?

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, मै दो शब्द कहना चाहता हूँ। जब सभा की शुरुवात हुई थी, प्रश्नकाल शुरु हूआ था। उस समय सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल द्वारा जो प्रश्न नियमीत रुप से पुछे जाते है, उसका जवाब देने वो खडे हूए थे। उस समय श्री. ओमप्रकाश अग्रवाल जी मे प्रश्न के पहले नवनियुक्त मा. आयुक्त साहब के बारे मे दो शब्द बोले थे। मुझे अच्छी तरह याद है, उन्होंने कल्पना की थी की, नवनियुक्त आयुक्त साहब आये है अच्छे काम होंगे। हम भी सहयोग देंगे और मा. आयुक्त साहब की यह पहली मा. महासभा थी। इसके पहले उन्होंने स्टँडींग मे पहली सभा अटेड की थी। लेकीन आज का दिन बडा दुर्भाग्य है की, एक आय.ए.एस. ऑफिसर आये है और जिस व्यक्ती ने शुरुवात मे आपने भाषण के अंदर बडी तारीफ की, उसी व्यक्ती को आज मा. महापौर द्वारा एक आदेश दिया गया। और जिसका पालन नही किया जा रहा है। पिछले आधे घंटे से इस सभा के अंदर घमासान मचा हुआ है। जिसकी जो मर्जी मे आता है, कुछ कहता जा रहा है। इस सभा के माध्यम से क्या मॅसेज जाएगा यह मेरे समझ के बाहर है। इसिलिए निवेदन है की, जो भी नियम के तहत है, उसके उपर कार्यवाही करते हूए इस सभा को आगे चलाया जाना चाहीए।

**श्रीप्रकाश जिलेदार सिंग :-**

मा. महापौर साहब, उन्होंने सदस्यों का बढाई किया है।

**जूबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, त्यांनी आपले शब्द मागे घेतले तर विषय इथे संपेल का?

**स्नेहा पांडे :-**

उन्होंने क्या गलत शब्द बोला जो वापस लेगे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, मा. सभागृह नेता मॅडम आणि मा. विरोधी पक्षनेता खरोखर या शहराचा विकास करायचा असेल आज सत्ताधाऱ्यांचा सभागृह नेता, विरोधी पक्षनेता पण सत्ताधाऱ्यांचा ॲक्चुअली या सभागृहामध्ये लक्षवेधी असे विषय आल्यांनतर मा. सभागृह नेता आणि मा. विरोधी पक्षनेता यांनी याच्यावर गांभीर्य बघायला पाहिजे आणि ते मला रिक्वेस्ट करतात तुम्ही विरोधी पक्षनेते आहात तुम्ही या लक्षवेधीचे वाचन केले पाहिजे आणि या सभागृहाची बाजू तुम्ही मांडली पाहिजे की, या लक्षवेधीमध्ये काय चुकीचे आहे?

**मिलन म्हात्रे :-**

विरोधी पक्षनेत्यांच्या कार्यालयात महत्वाच्या कागदपत्रांचा पत्रव्यवहार केला तर तो गहाळ होतो. ते आम्हाला सांगतात की, दुसरे पत्र आणून द्या. माझ्याकडचे पत्र गहाळ झाले आहे. कसले आले विरोधी पक्ष नेते?

**जूबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, माझी एक विनंती राहील की, याच्यानंतर कुठलीही लक्षवेधी सभागृहामध्ये कुठल्याही पक्षाने मांडली तर लक्षवेधी पूर्णपणे वाचा त्यातुन कुठली घ्यायची ती घ्या नंतर बाकीची फेटाळा कारण हा नेहमीचा विषय झालेला आहे. हा नेहमीचाच प्रॉब्लेम आहे. फक्त विषय वाचतात. त्याच्यावर आपली चर्चा होते. पूर्ण लक्षवेधी वाचु द्या. लक्षवेधी आहे त्याच्यावर चर्चा झाली, नाही झाली. तुम्ही फेटाळली तर चर्चा होणारच नाही. श्री. ओमप्रकाश अग्रवाल माझी तुम्हाला विनंती राहील तुम्ही दिलगीर व्यक्त करा आणि विषय सोडून द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वाचन करावे वाचन केल्यानंतर मला जे काही मागायचे असेल ते मी मागेन.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, आत्ता त्यांनी सांगितले की, त्या सदस्यांना थांबा सांगितले ऐकले नाही. गैरवर्तन केले म्हणून त्यांनी सांगितले की, त्यांना बाहेर पाठवा तसे केल्यानंतर आत्ता काही सदस्य त्याच्यामध्ये सांगतात की, ते पूर्ण वाचले पाहिजे हे केले पाहिजे. मग तुम्ही काय बोलता ते तुम्ही तरी स्वतः करा. मा. पिठासीन अधिकाऱ्यांनी जो निर्णय दिला त्याच्यामध्ये तुम्ही परत असे सांगणार. एवढे जर प्रेम आहे, एवढा सामोपचार आहे तर सभागृह अतिशय चांगले चालले पाहिजे. मग कशाला वादावादी होतात?

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर साहेब के आदेश का पालन होना चाहीए। सभा का टाईम वेस्ट हो रहा है। सचिव साहेब, जो होता है वो कार्यवाही जल्दी किजिए।

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, सन्मा. नगरसेविका सौ. मिरादेवी यादव यांनी या ठिकाणी आपल्याकडे लक्षवेधी दिलेली आहे. काशिमिरा पोलिस स्टेशनच्या मागे पावसाळ्यामुळे जी दुर्घटना घडली. तिथे अकरा लोक मृत्युमुखी पडलेले आहेत. ज्यावेळी ही घटना घडली तो शुक्रवार होता. साडेबारा एकच्या दरम्यान ही घटना घडलेली आहे. आपल्या महापालिकेमार्फत आपण घटनास्थळी पोहोचलो. आपले स्थानिक मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेंडोंसा यांच्याशी चर्चा करुन ते मा. मुख्यमंत्र्यांकडे पोहोचले. त्यांनी एक लाखाची मदत जाहीर केलेली आहे. असे असताना देखील यांची कथनी वेगळी असते करणी वेगळी असते. पहिल्यापासून आपल्याला या लोकांचा चांगला अनुभव आहे. प्रश्न श्रीम. मिरादेवी यादव यांचा आहे आणि त्या मेलेल्या माणसांच्या विषयावर राजकारण करण्याचे काम या ठिकाणी हे लोक करीत आहेत. आत्ता यांची पण सेकंड थर्ड टर्म आहे. यांना एवढे कळले पाहिजे की, सभागृहात हा विषय कशा पध्दतीने हाताळला पाहिजे. हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. असे असतानादेखील सदनामध्ये सन्मा. महापौरांनी रुलिंग दिल्यानंतर त्याची त्वरीत अंमलबजावणी प्रशासनामार्फत व्हायला पाहिजे. ठिक आहे, कळत नकळत बोलण्यातून काही चुका झाल्या असतील तर सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गारोडीया यांनी दिलगीरी व्यक्त केली पाहिजे. हा विषय या ठिकाणी मिटवला पाहिजे परंतु त्यांची तशीही भुमिका इथे या ठिकाणी दिसून येत नाही. त्यांनी आत्ता सभागृहामध्ये वेगळ्या पद्धतीने सन्मा. नगरसेविका यांना बरोबर घेऊन एक कवच तयार केले आहे. हे अशोभनीय वर्तन यांच्यामार्फत या ठिकाणी होत आहे, हे योग्य नाही. तर आपण आपल्याकडुन जे वक्तव्य झाले असेल तर दिलगीरी व्यक्त करा, विषय संपवा. शहराच्य विकासा संदर्भात अन्य महत्वाचे विषय आपल्याला घ्यायचे आहेत आणि पूर्ण करायचे आहेत. तर माझी पुन्हा विनंती आहे, मा. सभागृह नेता यांनी विनंती केली. मी विरोधी पक्षनेता विनंती करतो. शेवटी विरोधी पक्षनेता या नात्याने आपली जेवढी जबाबदारी आहे त्याच्यापेक्षा जास्त जबाबदारी आमची आहे. आम्हालाही जास्त काळजी आहे. नागरीकांच्या प्रश्नासाठी वाचा फोडण्याचे काम विरोधी पक्षनेता करतो. हे तुम्ही वैयक्तीक, स्वार्थी राजकारण करत आहात ते योग्य नाही तर आपण कृपया दिलगीरी व्यक्त करावी आणि जर दिलगीरी व्यक्त केली तर मा. महापौर साहेबांनी पुढील कार्यवाही करावी.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, श्री. आसिफ शेख आणि मा. सभागृह नेत्यांनी जो प्रश्न केला. श्री. ओमप्रकाश अग्रवाल आपल्याला वारंवार सांगतात कारण तो विषय जे अकरा लोक मयत झाले त्यापेक्षा महत्वाचा आहे. अजून दोन भिंत तीन दिवसा अगोदर त्या ठिकाणी कोसळलेल्या आहेत आणि त्या ठिकाणी अजून अपघात घडण्याची शक्यता आहे म्हणून ते वारंवार बोलतात की, लक्षवेधी वाचा म्हणजे तो विषय नाही. या विषयाशी संघटीत दुसरा त्याच ठिकाणचा विषय आहे. आपण ते वाचले असते तर आपल्या लक्षात आले असते हे जे बोलतात तो वेगळा विषय बोलत आहेत.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, ह्यांनी आत्ता इकडे वेळ घालविण्यापेक्षा मा. आयुक्त साहेब, मा. उपमहापौर साहेब, तुम्ही सगळ्यांनी वेळ द्या. पाच मिनिटे तुमच्या केबिनमध्ये घेऊन जा. त्यांचे ऐका आम्ही तोपर्यंत जसे थांबले आहोत तसे अजून थांबतो यांच्याशी या विषयावर चर्चा करा.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, त्यांचा विषय गंभीर आहे. तो भरणीचा विषय आहे भरणी केल्यामुळे भिंती कोसळल्या.

**नरेंद्र मेहता :-**

मा. सभागृह नेत्यांनी जे सांगितले त्याच्याशी मी सहमत आहे. ऑलरेडी एक महिना अगोदर पत्र दिले की, तिकडे एक भिंत कोसळणार आहे. कोणी काही कार्यवाही केली नाही. मा. आयुक्त महोदय, आपल्याला जे आत्ता सभागृहाने सांगितले, ऑलरेडी एक महिना अगोदर पत्र दिले होते. कोणी काही कार्यवाही केलेली नाही त्यानंतर आत्ता तीन दिवसा अगोदर भिंत कोसळली आहे. मग अजून किती पत्र द्यायची?

**मा. महापौर :-**

सिक्युरीटी गार्ड, श्री. ओमप्रकाश अग्रवाल को बाहर लेकर जाईए।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुमच्या आदेशाचे पालन होत नाही.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहब, सबका समय खराब हो रहा है। आप कामकाज की शुरुआत किजिए और उन्होंने कोई भी ऐसा शब्द नही बोला है की जो पिछे ले। कौनसा शब्द बोला है, आप बताईए। लक्षवेधी दिया हुआ हे। आप फेटाळ रहे है, ठिक है। लेकीन उसको एक बार रीड किजिए यह हमारी तरफ से निवेदन है।

**मा. महापौर :-**

बार बार बोलने के बाद मा. महापौर का अपमान हो रहा है, यह उचित नही है।

**स्नेहा पांडे :-**

उन्होंने कोई भी अभद्र शब्द का उपयोग नही किया है। किसी भी अभद्र शब्द का उपयोग हुआ है तो आप बताईए। हम वापस लेते है। उन्होंने कौनसा शब्द बोला है? सभागृह को पढकर सुना दिजिए यही निवेदन हमारा कब से चल रहा है।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, किती वेळ वाया चाललेला आहे. सिक्युरीटी आदेश का पाळत नाहीत?

**सिसिलया बावीघर :-**

त्यांनी एवढे काय चुकीचे बोलले गैरवर्तन केले असेल तर बोला.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सर्व सभागृहाला श्रीम. स्नेहा पांडेजी आपको नियम बता रहा हूँ। आप जरा नियम सुनिए। अध्यक्ष स्थानी असलेल्या प्राधिका-याने सभेत सुव्यवस्था राखली पाहिजे. आणि त्याच्या मते ज्या पालिका सदस्यांची वागणुक, वर्तणुक अत्यंत गैरशिस्तीची आहे अशा कोणत्याही पालिका सदस्यांस महापालिकेच्या सभेतून ताबडतोब निघून जाण्याविषयी निर्देश देता येतील आणि अशा पालिका सदस्याने ताबडतोब तसे केले पाहिजे व त्या दिवशीच्या सभेच्या राहिलेल्या कालावधीत अनुपस्थित पाहिजे. मा. पिठासीन अधिकारी सुव्यवस्था राखील आणि त्यास आपला निर्णय अंमलात आणण्यासाठी सर्व अधिकारी असतील. आपल्या निर्णयाचे पालन करणा-या.....................

**प्रशांत पालांडे :-**

मा. उपमहापौर साहेब हे सगळे नियम माहिती आहेत.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मी नियम वाचून दाखवतो आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, आत्ता नियम दाखवले, डायसवर कोणी बसायचे तेही आम्हाला जरा सांगा. सभाशास्त्र कामकाज सांगा. तुम्ही लाखो रुपये खर्च करुन ट्रेनिंगला गेले होते. त्यावेळी ट्रेनिंगला काय झाले? डायसवर कोणी बसायचे? मा. महापौर साहेब, तुम्हाला नियमच आहे तर मा. उपमहापौरांना डायसवर बसता येत नाही हा नियमच आहे. सभाशास्त्र कामकाज नियम आहे त्यांना वर बसताच येत नाही. बोलायचे तर लांब राहीले. तुम्हाला माहिती नसेल तर तुम्ही सचिवांना नियम विचारा आम्ही श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांना बाहेर पाठवतो. तुम्ही मा. उपमहापौरांना सांगा की, त्यांनी खाली बसावे. कारण ते सभाशास्त्र नियमात नाही.

**मा. महापौर :-**

श्री. नरेंद्र मेहता आप आदेश मत दो।

**नरेंद्र मेहता :-**

आदेश देत नाही, हात जोडून विनंती. आम्ही श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांना पाठवतो. आपणही सभाशास्त्र कामकाजाच्या नियमाचे पालन करा वर डायसवर जे नियमात आहे त्यांना बसवावे.

**(सभागृहात गोंधळ)**

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, या ठिकाणी सन्मा. माजी महापौर विद्यमान भाजपचे अध्यक्ष आणि सन्मा. नगरसेवक श्री. नरेंद्रजी मेहता, सभा कामकाज नियमाप्रमाणे व्यासपीठावर सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त आणि सचिव यांच्या व्यतिरीक्त कोणी बसू नये असे जरी नियम असले तरी आपण इतिहासावर विश्वास ठेवतो, जो इतिहास असतो, जी परंपरा असते ती परंपरा कायम असते. सन्मा. माजी महापौर हे देखील मा. महापौर होते. तेव्हा देखील परंपरा होती की, मा. उपमहापौर हे मा. महापौरांच्या बाजूला बसणार तेव्हा त्यांना आठवण झाली नाही. ही पश्चात बुद्धी आहे. यांना आत्ता ही बुद्धी आठवली आहे.

**भगवती शर्मा :-**

ती आमची चुक होती.

**स्नेहा पांडे :-**

मा. विरोधी पक्षनेता साहब, अगर दुसरोंको नियम बता सकते है तो कुछ नियमों को पालन खुद करना पडेगा।

**मा. महापौर :-**

श्री. भगवती शर्मा आपने जो चुक किया उसके वजह से अपना नगरपालिका हजार कोटी के नुकसान मे है।

**भगवती शर्मा :-**

मै इसके लिए प्रायश्चित करने के लिए तैयार हूँ।

**नरेंद्र मेहता :-**

हजार कोटीला किती शुन्य असतात ते माहिती आहे का? सचिव साहेब, सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख यांनी आत्ता सांगितले की, सभाशास्त्र नियम किंवा इतिहास दोघांमधुन एकच आहे. इतिहासात तुम्ही बघा, अडीच वर्षात माझ्या काळात एकाही सदस्याला बाहेर पाठवले नाही हा इतिहास आहे. आणि नियम लावायचा. कुठलातरी एक लावा. आयदर इतिहास, आयदर नियम.

**चंद्रकांत मोदी :-**

माजी महापौर ने श्री. एस.ए. खान साहब को बाहर भेजा था।

**नरेंद्र मेहता :-**

इतिहास तरी वापरा किंवा कायदा तरी वापरा.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर के आज्ञा का पालन होना जरुरी है।

**स्नेहा पांडे :-**

कायदा दोनों के लिए है। पहले वहाँ से पालन होगा तो यहाँ से होगा।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, काही निर्णय घेणार की नाही?

**प्रभात पाटील :-**

एक गोष्ट कळत नाही की, एका व्यक्तीच्या म्हणजे मला वाटते की, श्री. अनिल सावंत की कोणाची तरी "ज" च्या प्रस्तावावर एक सुचना आहे की, स्त्री भ्रुण हत्या टाळण्यासाठी त्यांनी काहीतरी प्रस्ताव आणला आहे. साहेब, स्त्रीयांची केवढी गरज आहे ते चित्र आत्ता तुम्हाला दिसत असेल.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही मानतो आणि आमचे हेच भविष्यात राहणार तुमचेही आमच्या पक्षात स्वागत करतो. स्त्री म्हणून यावे.

**अनिल सावंत :-**

स्त्रियांचा असा उपयोग आम्हाला अपेक्षित नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, आपल्याला परत विनंती करतो की, आपण विसरा आणि कामकाजाला सुरुवात करावी. शांततेने सभागृह चालवावे. आपण मोठे मन ठेवावे आणि जे काही असे शब्द सांगितले असतील ते वगळावे आणि कामकाज सुरु करावे.

**मा. महापौर :-**

मी विचारपूर्वक बोलतो म्हणून मी माझे शब्द कधी मागे घेत नसतो. जेवणाची सुट्टी जाहीर करत आहे.

**(जेवणाची सुट्टी दुपारी १.४५ वा ते २.४५ वा.)**

**नगरसचिव :-**

मा. पिठासीन अधिका-यांच्या परवानगीने सभेला सुरुवात करण्यात येत आहे.

**मा. महापौर :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल आप बाहर निकलो। आपको आदेश दिया है उसका पालन किजिए।

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला थोडी माहिती द्यावी, सभा तहकुब होती की, काय होते? ही सभा तहकुब होती का? सचिव साहेब, सभा तहकुबिचे नियम आणि कामकाजाबद्दल आपण जरा सांगावे. तहकुब करायला खालून ठराव मांडावा लागतो. त्याला अनुमोदन पाहिजे नंतर तहकुब होते.

**मा. महापौर :-**

या ठिकाणी आपण नियम सांगु नका आधी त्यांना बाहेर काढा.

**नरेंद्र मेहता :-**

पहिले आम्ही बोलतो. त्यांचा विषय वेगळा आहे, माझा वेगळा आहे. तुम्हाला असे तहकुब करता येत नाही. पाहिजे तसे कायदे लावत जाणार का? नियमाप्रमाणे चालवा. तहकुब खालुन मांडायला पाहिजे,

अनुमोदन व्हायला पाहिजे. तुम्ही डायरेक्ट तहकुब करुन निघुन जाणार असे सभागृहात चालते काय? आपण खुलासा करावा.

**नगरसचिव :-**

मा. महापौर हे पिठासीन अधिकारी आहेत. मा. पिठासीन अधिका-यांच्या स्वेच्छेनुसार कोणत्याही वेळी हजर राहणा-या बहुसंख्य पालिका सदस्यांच्या संमतीने.........

**नरेंद्र मेहता :-**

सदस्यांच्या संमतीने म्हणजे ठराव होतो आम्ही त्याला संमत नाही.

**अनिल सावंत :-**

कोणी विरोधपण केला नाही म्हणजे संमती होती.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

बहुसंख्य सदस्यांची संमती होती. तुमचा विरोध मान्य आहे.

**नरेंद्र मेहता :-**

बहुसंख्य संमती म्हणजे कुठे काय आहे? सांगितले म्हणून असे कोणी सांगितले आम्ही सांगतो, नव्हती सचिवांनी सिध्द करावे की, बहुसंख्य संमती होती.

**नगरसचिव :-**

मा. महापौर सिध्द करतील.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही सिध्द करा मग बहुसंख्य संमती कशी होती?

**मा. महापौर :-**

चर्चा नंतर करण्यात येईल. सिक्युरीटी आप श्री. ओमप्रकाश अग्रवाल को बाहर निकालो।

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, आम्ही आपल्याला आत्ता पत्र दिलेले आहे. आपल्याला एखादे याची माहिती असेल तर आपल्याकडे विधी विभाग आहे आणि सचिव साहेब आहेत. त्यांच्याकडुन माहिती घ्या. श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांना आम्ही बाहेर पाठवतो. तुमचा अपमान होऊ नये. तुम्ही जी रुलिंग दिली बाकी इतर कायद्याचेपण आपण पालन करावे. आम्ही आपल्याला पत्र दिलेले आहे त्याप्रमाणे आपण योग्य सभा चालवावी.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

त्यांना कायद्याचे पालन करायला सांगा.

**नरेंद्र मेहता :-**

ते आम्ही करतो. आम्ही मा. महापौरांशी बोलतो तुमच्याशी नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मी गेले एक वर्ष या डायसवर आहे, तेव्हा तुम्हाला कळले नाही की, मा. उपमहापौर इकडे बसू शकत नाही?

**(सभागृहात गोंधळ)**

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहब आपने रुलिंग देने के बाद पत्र मिला है। तो पहले जो रुलिंग दिया उसका पालन किजिए। हम यह नही कहते की, इन्होंने पत्र दिया उसपर कार्यवाही मत करो। जो पत्र दिया है वो बाद मे, पहले आपने जो रुलिंग दिया है, उसपर कार्यवाही किजिए क्योंकी पहले भी दो घंटे समय बरबाद हो चुका है।

**मा. महापौर :-**

सिक्युरीटी आप महानगरपालिका के सिक्युरीटी है। महापौर का आदेश पालना आपका कर्तव्य है।

**नरेंद्र मेहता :-**

मग कायद्याचे पूर्ण पालन करा. आम्ही पत्र दिले आहे. सभाशास्त्र कामकाजाचे पालन करा. आम्ही बाहेर जातो.

**मा. महापौर :-**

ज्या प्रकरणामुळे तहकुब केली आहे त्याप्रमाणे त्यांनी जायला पाहिजे.

**(सभागृहात गोंधळ)**

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, आपण शांततेने संपवा. हे बाहेर जातील. आपण पण कायद्याचे पालन करा. मा. पिठासीन अधिकारी म्हणून जे व्यासपिठावर बसले आहेत त्यांना खाली पाठवा, विषय संपला.

**मा. महापौर :-**

कोणाला बाहेर पाठवायचे आणि कोणाला आतमध्ये ठेवायचे ते आदेश आपण मला देऊ नका.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे की, यातून एक यशस्वी मार्ग काढा. हे सभागृहाच्या दृष्टीने चांगले नाही. आज मा. आयुक्तांची पहिली सभा आहे.

**मा.महापौर :-**

आपण जे करणार ते सगळे चांगले आहे..............

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही करतो तुम्ही पण कायदयाचे पालन करा. तुम्हाला पत्र दिले आहे, त्या अनुषंगाने नियमाप्रमाणे कामकाज चालवा.

**मा.महापौर :-**

जेव्हा तहकुब केली तेव्हा हा उद्देश तुम्ही मला सांगितला असता तर चालले असते.

**नरेंद्र मेहता :-**

नियमाप्रमाणे सभा कामकाज चालवा. आपल्याला माहिती नसेल तर विधी अधिकारी आहेत, त्यांना विचारा. सचिवांना विचारा. ते आपल्याला सभाशास्त्र कामकाजाबद्दल माहिती देतील. बाहेर का जायचे, सभाशास्त्र कामकाज नियमात आहे म्हणून. मग हे पण नियमात आहे की, कोणी कोणी बसावे.

**भगवती शर्मा:-**

साहब, यह बोल रहे है कि,विधी अधिकारी और सचिव जैसे बोलते है उनसे कामकाज का नियम...................

**नरेंद्र मेहता :-**

कायदे का जानकारी लिजिए।

**भगवती शर्मा:-**

जैसे यह नियम की बात करते है। तो पहले का नियम है कि, जब इन्होंने आदेश दिया कि इनको सभा छोडनी चाहिए। तो उसके हिसाब से छोडनी चाहिए कि नही ?

**नरेद्र मेहता :-**

हम मानते है। हम आपका काम कम करेंगे। हम जायेंगे आज कम से कम कायदे का पालन हो जाए। आज सभा शास्त्र नियम का पालन हो जाए हम सन्मान करते है।

**मा. महापौर :-**

सभाशास्त्राचे पालन करायचे तुम्ही मला सांगायची गरज नाही आप हमेशा बोलते है एक हजार के आकडे पर कितने झीरो है यह आप बोलते है आप यहा पर हिरो मत बनो आप आटा बेचनेवाले चोर लोग आप मुझे कानुन सिखाते है।

(सभागृहात गोधळ )

**नरेद्र मेहता :-**

आपण सभागृहाच्या नियमाचे पालन करा. आम्ही ही करतो .विषय संपला. आमची जास्त मागणी नाही, अपेक्षा नाही.

**मा. महापौर :-**

ज्यावेळेस तहकुबचा विषय झाला त्यावेळेस चालले असते.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही नियमांची मागणी करतो आम्हाला चांगले माहिती आहे.

**मा. महापौर :-**

मला नियमाचे काहीच माहिती नाही. मला एक हजारावर किती झीरो आहेत ते माहिती नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मग तुम्ही माझाी ऐपत काढायची नाही. हजार कोटी तुम्ही काढले की, आम्ही काढले? मी गप्प बसलो होतो. एकही विषय काढला नाही. तुम्ही काढले. प्रोसीडींग काढा, रेकॉर्डिग काढा आणि बघा. सभा अर्धा तास तहकुब करा. आपण रेकॉर्डिग ऐकू, सचिव साहेब, जे कामकाज नियम आहे, त्याप्रमाणे सभा कामकाज चालले पाहिजे. उदया मा. महापौर साहेबांनी सागितले की, सर्वानी वर बसा. तर तसे कामकाज चालत नाही आपल्याला सभा चालवता येणार नाही. जोपर्यत नियमांचे पालन होत नाही तुम्ही त्यांना ते सांगा. सभाशास्त्र कामकाज नियमाप्रमाणे चालले पाहिजे हे आपले काम आहे.

**नगरसचिव :-**

त्यांना माहिती अवगत करून दिली आहे.

**एस.ए.खान :-**

मा. महापौर साहेब हे कधीपर्यत असे चालणार आहे. सकाळपासून एक विषय झालेला नाही. सिक्युरिटी तुमच्या आदेशाचे पालन करत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, आपल्याला एक विनंती आहे आम्ही नावे घेतलेली आहेत. जेवढे लोक या ठिकाणी आहेत हे सर्व त्या ठेकेदाराच्या पे रोलवर नाहीत. याच्यातील अर्धी माणसे बाहेरची आहेत. आणि एक सामान्य नागरिक आतमध्ये आला कसा ? हे पेरोलवर नाहीत. पाहिजे तर आपण आत्ता पेरोल मागवा. ही सर्व नावे नाहीत.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, त्यांनी अतिशय चांगला विषय घेतला. एखादया ठिकाणी, मग ती पोलीस यंत्रणा असू द्या, आर्मीची असू दया किंवा एस.आर.पी.ची असू दया, ज्या ठिकाणी कमी पडतात त्या ठिकाणी दुसरीकडून बोलवले जातात. तो फार मोठा गुन्हा नाही.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, सभेचा वेळ जातो आहे. आपण नियमाचे पालन करा आणि सभा चालू करायला सांगा.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर साहेब, मला वाटते की, आज नवीन कमिशनर साहेब आले. त्यांच्यासमोर यांचा मोठेपणा व्हावा म्हणून हे सगळे नाटक चाललेले आहे.

**मा. महापौर :-**

त्यांनी स्पष्टपणे विचारले की, एक हजारावर झीरो किती?

**नरेंद्र मेहता :-**

मग तुम्ही हजार करोड बोलायचे नव्हते. आणि अभ्यास करुन यायचे, ताबडतोब बोलायचे होते की, किती झीरो आहेत. आपल्या आदेशाचे आम्ही पालन करु पण सभाशास्त्र नियमाचे आपण पालन करा.

**मा. महापौर :-**

सभेचे नियम तुम्ही पाळता तर इकडे एका माणसाने एक तास बोलायचे का?

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, ठिक आहे आता मा. उपमहापौरांचा काय तो निर्णय मा. पिठासीन अधिकारी घेतील पण मागे जे अधिकारी बसलेले आहेत. हे नक्कीच आपल्या अधिकारातील आहे की, त्यांनी ही या व्यासपिठावर बसता येत नाही. आपण त्यांना आदेश द्या. त्यांना मा. महापौरांच्या आदेशाची आवश्यकता नाही.

**मा. महापौर :-**

जेव्हा अधिकारी सभेमध्ये येत नाहीत तेव्हा हेच सांगता की, अधिकारी आलेले नाहीत.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, एक तासा अगोदर सभेचा खोळंबा झाला. एक तासासाठी तहकुब झाली. आता परत सभा चालू होऊन जवळ-जवळ अर्धा पाऊण तास झाला. माझी मा. महापौरांना, मा. आयुक्त साहेबांना विनंती आहे की, जर सिक्युरिटीमार्फत काही काम होणार नसेल, तर कृपया यांना इथून घालवा. कारण हे फुकटमध्ये इथे उभे राहण्यासाठी बोलवलेले नाहीत. कुठले तरी काम त्यांच्याकडून व्हावे म्हणून बोलवले आहेत. ते जर काहीच करणार नसतील तर ही बाहुली इथे उभी ठेवण्यात काही अर्थ नाही.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब यांना परमनन्ट घालवा.

**लक्ष्मण जंगम :-**

उद्यापासून यांचा सिक्युरिटीचा ठेका इकडे राहता कामा नये.

**(सभागृहात गोंधळ)**

**प्रभात पाटील :-**

संपूर्ण सभागृहामध्ये आज जो उच्छाद मांडला गेला तो सगळा उच्छाद पाहता आणि नगरसेवक आपला किंमती वेळ खर्च करुन इथे येतात. शहराच्या प्रश्नासाठी येतात. या शहराच्या विकासासाठी इथे येतात. कोणी हे भांडण किंवा मारामाऱ्या बघायला इथे येत नाहीत. विशेषतः महिला वर्गासाठी मी सांगेन त्या सगळे काम सोडून इथे आलेल्या आहेत आणि ही सभा होणार नसेल, असेच प्रकार चालत असतील तर मी तुम्हाला विनंती करते की, ही सभा तीन दिवसांसाठी तहकुब करावी आणि पुन्हा एकदा ही सभा बोलविण्यात यावी. असा मी ठरावच मांडते.

**लक्ष्मण जंगम :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सर्व सदस्य, नगरसेविका, नगरसेवक या ठिकाणी आता जो आपल्या सर्वांचा वेळ घालवलेला आहे. श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांच्यामुळे हा वेळ गेलेला आहे. हा खरे म्हणजे सगळयांच्या अपमान आहे. या ठिकाणी या सभागृहाचा फार वेळ गेलेला आहे म्हणून काही कारणास्तव आजची सभा मी ठरावाप्रमाणे तहकुब करतो. तरी पुढच्या सभेची तारीख सर्वांना कळविण्यात येईल.

**सभा तहकुबी ठराव क्र. ४० :-**

आजची सभा ३ दिवसांसाठी तहकुब करण्यात येत असून ती सभा ३ दिवसानंतर घेण्यात यावी असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- सायं ४.२० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**